प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते

ब्रह्मतेजो बलंबलम्



हीरकमहोत्सवी
कोल्हापूर चित्पावन संघाचे
मुखपत्र

स्थापना : १९६४

६१

# मासिक नवस्नेह

वर्ष १२ वे : अंक १
एप्रिल २०२६



प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१–२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५

Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

# होम मिनिस्टर कार्यक्रम - खेळ पैठणीचा



ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम यांचे वतीने कोल्हापूर चित्पावन संघ आणि कऱ्हाडे ब्राह्मण संघ यांच्या सहसंयोजनाने महिला दिनाच्या पूर्व संध्येला दि. ७ मार्च २०२६ रोजी संध्याकाळी ६ वा. मंगलधाम येथे श्री. महेश गोरबेकर प्रस्तुत 'होम मिनिस्टर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. १७० हून अधिक महिलांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाचे मेन्टॉर श्री. महेश गोरबेकर यांनी महिलांना स्पर्धात्मक रंजक प्रश्न विचारले. त्यांचेकडून विविध मजेदार खेळांसह संगीत खुर्चीचा खेळही घेतला. महिलांनी उत्स्फूर्तपणे गाणी म्हटली. सहभागी विजेत्या महिलांना पैठणीसह विविध आकर्षक बक्षिसे देण्यात आली.

- **स्पर्धेतील विजेत्या महिला पुढीलप्रमाणे :-** प्रथम क्रमांक : सौ. वैशाली कुलकर्णी (पैठणी विजेती), द्वितीय क्रमांक : सौ. शर्वरी आराणके (उपविजेती), तृतिय क्रमांक : सौ. प्राजक्ता चिंचळकर (उपविजेती)
- **लकी ड्रॉ विजेत्या :** आराणके आजी (वय ८२), वैशाली बोकिल आणि सौ. रुपाली पाचलग.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी तिन्ही संयोजक संस्थांचे पदाधिकारी आणि महिला मंडळाने खूप परिश्रम घेतले.

# मराठी दिनदर्शिका वितरण व विशेष सत्कार




हिंदू नववर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन व वाटप गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वा. चित्पावन संघाच्या कार्यालयात करण्यात आले. या कार्यक्रमात यावर्षीच्या दिनदर्शिकेसाठी जाहिराती गोळा करण्यापासून छपाई व प्रकाशन करणेपर्यंतची जबाबदारी स्वीकारून ती लीलया पार पाडणारे श्री. संजीव चिपळूणकर यांचा सीए श्री. विकास परांजपे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यानंतर सीए परीक्षेत घवघवीत यश मिळवलेबद्दल श्री. यश परांजपे व जान्हवी करमरकर यांचा संघातर्फे गौरव करण्यात आला. उपस्थितांचे स्वागत श्री. केदार जोशी यांनी केले. अध्यक्ष श्री. मकरंद करंदीकर यांनी मनोगत व्यक्त केल्यानंतर सीए श्री. विकास परांजपे यांनी मार्गदर्शन केले. श्री. संजीव चिपळूणकर, श्री. यश परांजपे, कु. जान्हवी करमरकर आणि सीए श्री. मुकुंद भावे यांनी देखील मनोगत व्यक्त केले. श्री. प्रसाद भिडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी श्री. नंदकुमार मराठे, सौ. संगीता आपटे, सौ. सीमा गोखले, श्री. किरण जोशी, श्री. संतोष साने, श्री. श्रीकांत लिमये, श्री. दत्तात्रय आपटे, श्री. प्रसाद खाडिलकर, श्री. महेश खाडिलकर, श्री. निनाद खरे व मान्यवर सभासद उपस्थित होते. अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष १२ वे : अंक १ : एप्रिल २०२६**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984


**अनुक्रम**


१) संपादकीय /४

२) गुढी पाडवा : एक सांस्कृतिक उत्सव /५
– श्री. नंदकुमार मराठे

३) चंपाताई पेंढारकर /८
– वैदेही जोशी

४) ज्ञानसूर्याची सावली /१०
– सौ. मंजुश्री गोखले

५) सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी' /१३
– सौ. मंजुश्री गोखले

६) मनाला खुपणारं कागदावर /१६
– कमला हर्डीकर

७) मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा /१९
– ओंकार गाडगीळ

८) भारतरत्न पंडित भीमसेन जोशी/२१
– विकास मेहंदळे

९) वधूवर माहिती यादी /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०





हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१–२५४६२२५
०२३१–२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५

- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष) 9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष) 9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह) 7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह) 8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार) 8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231–2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**


श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.



**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. २० वर दिली आहे.**

# संपादकीय...

नमस्कार मंडळी !

काय म्हणतंय ऊन? सूर्य तर अक्षरश: आग ओकतोय ! सकाळी १० नंतर बाहेर बघायलाही नको वाटतंय ! बाहेर पडायची बात तर दूरच ! अर्थात कलिंगड, आईस्क्रिम, उसाचा रस, अनेक प्रकारची सरबतं यामुळं ही तलखी थोडी कमी होते! पण किती? भरल्या गाडीवरून सूप खाली काढलं की जेवढं वजन कमी होईल तेवढीच ! सांगायचा मतितार्थ, हे ऊन दाहकही आहे आणि घातकही ! तेव्हा सांभाळा बरं ! स्वत:ला आणि कुटुंबालासुद्धा ! आता एप्रिल महिना येतोय. अजून मे महिना यायचा आहे ! मोठ्या संयमानं आणि धैर्यानं आयुष्याला या नैसर्गिक जहालतेचा सामना करावा लागणार आहे. एक विचार सांगते, जो सगळीकडेच लागू होतो - नैसर्गिक जहालतेला आणि संघर्षमय परिस्थितीला.

**हिंमत कभी नही हारना ।**
**बस ड़टके रहना ।**
**क्यूंकि...**
**धूप कितनी भी तेज क्यों न हो**
**पर समंदर सुखा नही करती ।**

आणि या धैर्याला जोड म्हणून आपला नवस्नेह आहेच ! अनेक रंजक माहिती आणि मनोरंजनाने भरलेला ! अर्थात त्या सूर्याची काहिली कमी करायला नवस्नेह सोबत सुट्ट्यांचा सुद्धा माहोल आहे. पण या आखाती युद्धानं या सगळ्या आनंदावर विरजण पडतंय की काय अशी भीती आणि परिस्थिती सगळीकडे निर्माण झाली आहे. गॅस, पेट्रोल, डिझेल टंचाइ ! त्यामुळे हॉटेल्समध्ये पदार्थावरील निर्बंध. 'आग रामेश्वरी आणि बंबच्या ऐवजी धूर सोमेश्वरी' अशी आपली अवस्था झाली आहे ! अर्थात आपण यात काहीच करू शकत नाही, परिस्थितीला सामोरे जाण्याशिवाय आणि स्वीकारण्याशिवाय ! असो, जास्त गंभीर चर्चा नको. जेवढं शक्य आहे, जिथं शक्य आहे तिथं दोन-चार दिवस जाऊन स्वत:चा, मुलांचा आणि परिवाराचा शीण घालवून या ! आणि कुठं जायला नाही जमलं तरी नाराज होवू नका. कारण -

**जिंदगी में कुछ अरमान**
**ओंस की तरह होते है ।**
**जिन्हे छूनेसे उंगलिया भीगती है**
**लेकिन हात खाली रहते है ।**

तेव्हा Be Happy ! कारण हे ऊन चटका देईल, पण आनंद नष्ट करू शकणार नाही.

मित्रांनो, नवस्नेहमध्ये तुमची आवडती नेहमीची सदरे आहेतच. पण आपल्या माननीय संपादकांचा गुढी पाडव्याविषयी माहितीपूर्ण लेखही या अंकात आहे बरं ! तेव्हा नवस्नेह वाचून माहिती सोबतच मनोरंजन मिळवा आणि काही काळ तळपणारं ऊन विसरून जा !

कराल ना असं? धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# गुढी पाडवा : एक सांस्कृतिक उत्सव

प्राचीनता - पाडवा - गुढीपाडवा. साडेतीन मुहूर्तापैकी एक पूर्ण मुहूर्त म्हणून या दिवसाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. चैत्र शुद्ध प्रतिपदेला ब्रह्मदेवाने निर्माण केलेल्या वस्तूमात्रानेही आपल्या नियोजित कार्याला याच दिवशी सुरूवात केली. जगाच्या निर्मितीनंतर कालगणनेलाही गुढीपाडव्यादिवशी सुरूवात झाली.

प्रभू रामचंद्राने वालीच्या त्रासातून दक्षिणेकडील प्रदेश मुक्त केला. त्यासमयी जनतेने गुढ्या तोरणे उभी करून आनंदोत्सव साजरा केला, तो दिवस गुढीपाडव्याचा ! १४ वर्षे वनवास भोगून प्रभू श्री रामचंद्रांनी याच दिवशी अयोध्या नगरीत प्रवेश केला !

महाभारतातील प्राचीन ग्रंथात वैशंपायन ऋषींनी जनमेजय राजाला कथा सांगितली.

चेदी देशाचा राजा वसू, राज्याचा त्याग करून अरण्यात तपश्चर्येसाठी गेला. भगवान इंद्र प्रसन्न होऊन वसू राजाला पृथ्वीचे पालन करण्यासाठी एक वेळूची काठी दिली व तिला सुशोभित करून वसू राजाने काठीची पूजा केली. तो दिवस गुढीपाडवा.

या गुढीला ब्रह्मध्वज असेही म्हणतात. त्यामुळे गुढीतोरणे उभी करून ध्वज उभे करून आनंदोत्सव करण्याची प्राचीन परंपरा गुढी पाडव्याला प्राप्त झाली आहे.

**गुढीची परंपरा**

या दिवशी वडीलधाऱ्या पुरुषांनी वेळूची/ बांबूची मोठी काठी धुऊन स्वच्छ करून घ्यावी. एका टोकाला रेशमी वस्त्र,चांदीचे, पितळेचे, तांब्याचे चंबूच्या आकाराचे पात्र पालथे घालावे. कडूलिंबाचा पाला, चाफ्याची पांढरी फुले अथवा फुलांची माळ, साखरेची माळ बांधून घरासमोर उंच जागी, अंगणात गुढी उभी करावी. ।। ॐ ब्रह्मध्वजाय नम: ।। या मंत्राने गुढीची षोडशोपचारे पूजा करावी. सायंकाळी सूर्यास्ताच्या वेळी ही गुढी, हा ब्रह्मध्वज खाली उतरवावा, अशी प्रथा आहे.

**गुढीची उभारणी**

गुढी पाडव्याला कडुलिंबाची भाजी खाण्याची पद्धत रूढ आहे. आयुर्वेद शास्त्रात कडुलिंबाचे महत्त्व अधिक आहे. कडुलिंबाला अमृतफळ असेही म्हणतात. चैत्र महिन्यात वसंत ऋतूची सुरूवात फाल्गुन महिन्यातील हेमंत ऋतूमुळे व त्या दोन्ही ऋतुतील सूर्याच्या दाहक किरणांमुळे पित्ताशय, मूत्राशय, भूक मंद होणे, घाम येऊन अशक्तपणा येणे यांसारख्या व्याधी उद्‌भवतात. त्याकरिता कडूलिंबाचा रस आरोग्यदायी मानला आहे.

**कडूलिंबाची गोड कहाणी**

गुढीला बांधलेली गोड साखरेची माळ व कडूलिंबाचा पाला हा जीवनातील कडू व गोड प्रसंगाला एकत्रित तोंड देण्याची कदाचित शिकवण देत असावा. 'चांदोबा, चांदोबा भागलास का? लिंबोणीच्या झाडामागे लपलास का?' ही बालकविता लहान मुलाला चंद्राचा शीतल शांतपणा व लिंबोणीच्या नावामुळे मुलाची भूक वाढवून लहान मुलाला घास भरवीत असल्याचे चित्र आपण आजही पाहतो.

**नूतन संवत्सर**

सातवाहन ऊर्फ शालिवाहन राजाने स्वतःच्या नावे शक सुरू केला. त्याला शालिवाहन शक असेही म्हणतात. हे शक गुढीपाडव्यालाच सुरू केले. सृष्टीचक्रातील सहा ऋतूंचे चक्र पूर्ण होऊन पुन्हा चैत्र पाडव्याला वसंतऋतूने हे कालचक्र पुन्हा कार्यान्वित होते. एकूण ६० संवत्सरे आहेत. भगवान नारद त्यांची भार्या नारदीस ६० पुत्र झाले. त्यांच्या नावांची ही संवत्सरे असल्याचे पौराणिक उल्लेख आढळतात. पहिले नाव प्रभव व शेवटचे नाव क्षय.

**पंचांग**

भारतीय पंचांगाची सुरूवात चैत्र शुद्ध प्रतिपदेने होते. महाराष्ट्रात एकूण १८ पंचांगे प्रसिद्ध होतात. पंचांगांचा कालावधी व निर्मितीचा काळ ३००० (तीन हजार) वर्षांपूर्वीचा आहे. पहिल्या शतकात महाराष्ट्र प्रांतातील राजा पलुमाची सातकर्णी याने आपल्या नावे नवीन शालीवाहन शक सुरू केले. १ ला शककर्ता राजा धर्मराज, २ रा उज्जैनीचा राजा विक्रम, ३ रा पैठणचा राजा शालीवाहन, ४ था सिंधुदेशाचा राजा विजयाभिनंद, ५ वा धारातीर्थीचा राजा नागार्जुन व ६ वा रायगडचा राजा शिवछत्रपती शिवाजी महाराज यांना शककर्ते म्हणून ओळखले जाते.

तिथी, वार, नक्षत्र, योग व करण ही पंचांगाची पाच प्रमुख अंगे. ज्योतिषशास्त्र, खगोलशास्त्र यावर आधारित पंचांगाची निर्मिती आहे. श्री.लाटकर, दाते, रूईकर, राजेंदेकर, पारनेरकर, देशिंगकर, टिळक वगैरे संस्थापकांनी पंचांगे प्रसिद्ध केली आहेत. १८ भाषेत पंचांगे प्रसिद्ध होतात. सर्वांच्या पद्धतीमध्ये एकसूत्रता आढळते.

**चैत्रगौरी**

चैत्र पाडव्याला गौरीची तीज असते. यावेळी गौरी माहेरपणास येते व ती अक्षय्यतृतीयेपर्यंत वास्तव्य करते, अशी पौराणिक आख्यायिका आहे. त्यामुळे या गौरीच्या आगमनाप्रित्यर्थ या महिन्यात घरोघरी माहेरवाशिणी हळदीकुंकू, भेटीगाठी, चर्चासत्रे, महिलांचे खेळ, विविध सांस्कृतिक कार्यक्रमाने गुढीपाडव्यापासून या सत्राला सुरुवात करतात. काकडी, पन्हे, चाफ्याची फुले, आंब्याची कोशिंबीर, अत्तर, गुलाबपाणी, मोगऱ्याचे गजरे, बत्तासे मांडून गौरीची आरास केली जाते.

**प्रभू रामजन्मोत्सव**

४ वर्षे वनवास भोगून प्रभू रामचंद्राने गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर पुन्हा अयोध्या नगरीत आगमन केले. चैत्र शुद्ध प्रतिपदा ते रामनवमी या नऊ दिवसांत सर्वत्र प्रभू रामचंद्रांचा नवरात्रौत्सव साजरा होतो. रामनवमीला ठिकठिकाणी राम जन्मकाळ व रथोत्सवाचे आयोजन केले जाते.

**जोतिबाच्या नावानं चांगभलं**

श्री महालक्ष्मीचा सेनापती जोतिबा, करवीर नगरीच्या उत्तरेला डोंगरावर वाडी रत्नागिरी या भागात जोतिबाचे वास्तव्य अतिप्राचीन आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणून गणल्या गेलेल्या जोतिबाच्या नावाने चैत्राच्या पाडव्याच्या निमित्ताने भक्तांचे खेटे सुरू होतात. चैत्र शुद्ध पौर्णिमेला मोठा उत्सव असतो. सारा आसमंत जोतिबाच्या नावाने दुमदुमून जातो. गुलाल, खोबऱ्याची उधळण, मानाच्या सासन काठ्या, टाळ, मृदुंग वाद्यांच्या गजरात लाखो भक्तांची यात्रा भरली जाते. चैत्र कृष्ण प्रतिपदेला श्री महालक्ष्मीच्या रथोत्सवाचे आयोजन केले जाते.

**सरस्वतीचे पूजन**

गुढीपाडवा बालमनाचा आनंदोत्सव. चिमुकली, चिमुरडी मुले-मुली आपल्या घरातून दगडी, पत्र्याच्या पाटीवर गुढीचे चित्र काढून शाळेत जातात. निरागस मनाने ही हसरी बालके गुढीच्या चित्राचे मनोभावे पूजन करतात. घरातील वडिलधारी माणसे, शाळेतील गुरुजनांना वंदन करून आयुष्यभर ज्ञानाचा कण नि कण गोळा करण्याच्या ज्ञान यज्ञाचा श्री गणेशा सुरू करतात. नवे कपडे, शुचिर्भूतता, गोडधोड पदार्थ, चुरमुरे, खोबरे याचा मनसोक्त आस्वाद घेऊन सरस्वतीचे पाईक होण्यास धन्यता व्यक्त करण्याने आनंद द्विगुणीत होतो.

**नव्याची सुरुवात**

चैत्र शुद्ध प्रतिपदा गुढीपाडवा, कार्तिक शुद्ध प्रतिपदा दीपावली पाडवा, अश्विन शुद्ध दशमी विजयादशमी, दसरा व वैशाख शुद्ध तृतीया हे हिंदू पंचांगातील साडेतीन मुहूर्त. या मुहूर्तावरील कोणतीही सुरूवात निर्वेध यशस्वी होते. नवे उद्योग, नवे व्यवसाय, नवी दिशा, नवीन निवासस्थान, प्रवेश यासारख्या अनेक नवनवीन उद्योगाची सुरूवात

पाडव्याच्या शुभमुहूर्तावर होते. नव्या क्षितीजाची शुभ सुरूवात करून अनेक नव्या संकल्पना शुभ कार्याची सुरुवात या मुहूर्तावर होते.

**घरोघरी आनंद**

चैत्र शुद्ध पाडव्याच्या मुहूर्तावर घरातील संपूर्ण वातावरण मंगलमय होते. साफसफाई, सडा रांगोळी, अंगणात गोपद्म, चंद्र, सूर्य, गदा, पद्म, स्वस्तिक, कमळ, गरूड, फणी, करंडा अशा विविध प्रकारच्या रांगोळ्या, गुढीपूजन, ब्रह्माची पूजा, ग्रंथ वाचन, पंचांग वाचन, पाणपोईची सुरूवात, नवीन कपडे, धार्मिक, सांस्कृतिक, मंगलमय वातावरण, श्रीखंड पुरी, पुरणपोळी, बासुंदी, जिलेबी, साखरभात वगैरे पंचपक्वान्नांचे, मिष्टान्नाचे भोजन यामुळे सारे वातावरण मंगलदायी होते.

**खरेदीसाठी झुंबड**

चैत्र पाडव्याच्या शुभमुहूर्तावर ठिकठिकाणचे महत्त्वाचे रस्ते माणसांनी फुललेले दिसतात. कोल्हापुरात श्री महालक्ष्मी मंदिर, महाद्वार पथ, ताराबाई पथ, भवानी मंडप, सराफ बाजार, गुजरी कट्टा, शिवाजी पुतळा, रंकाळा मार्ग, शाहूपुरी, राजारामपुरी, व्यापारी पेठ, लुगडी ओळ, पापाची तिकटी हे सर्व मार्ग अक्षरशः लोकांच्या गर्दीने फुलून जातात.

कपडे, साड्या, नवीन वस्तू, दागिने, मंदिरातील विविध देवदेवतांचे दर्शन, नवीन जागा, नवीन कार्यालये, नवे उद्योग, नव्या व्यवसायासाठी कंपनी, बिल्डर, दुकानदार, व्यापारी, उद्योजक, डेव्हलपर्स सज्ज असतात. लहान मुलांपासून तरूण, तरूणी, वृद्धांपर्यंत सारेजण आपआपल्या परीने या उत्सवात धावत असतात. काहीतरी नवीन खरेदी होतेच. फ्रीज, टीव्ही, स्कूटर, मोटारगाड्या, रेडिओ, पंखे, अलंकार, साड्या, कापड, कपडे, वॉशिंग मशीन या सारख्या खरेदीसाठी झुंबड उडते.

**– नंदकुमार मराठे**

**दिनविशेष एप्रिल २०२६ पराभवनाम संवत्सरे**    **सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**

**चैत्र-वैशाख १९४८-४९**    **श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे । साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**




**बुधवार दि. १ :** ज्योतिर्लिंग यात्रा, **गुरुवार दि. २ :** हनुमान जयंती, महालक्ष्मी रथोत्सव, **शुक्रवार दि. ३ :** छ.शिवाजी महाराज पुण्यदिन, गुडफ्रायडे, **रविवार दि. ५ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो. ९.३८ वा.), ईस्टर संडे, **शनिवार दि. ११ :** महात्मा फुले जन्मदिन, **मंगळवार दि. १४ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, **बुधवार दि. १५ :** श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी, **रविवार दि. १९ :** श्री परशुराम जयंती, छ.शिवाजी महाराज जयंती, महात्मा बसवेश्वर जयंती, अक्षय्यतृतिया, **मंगळवार दि. २१ :** श्री आद्य शंकराचार्य जयंती, **बुधवार दि. २२ :** जागतिक वसुंधरा दिन, **गुरुवार दि. २३ :** गुरुपुष्यामृत, जाग. पुस्तक दिन, **शुक्रवार दि. २४ :** शंकर महाराज पुण्यतिथी, **गुरुवार दि. ३० :** श्री नृसिंह जयंती, राष्ट्रसंत तुकडोजी म. जयंती.

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत. तसेच ज्यांना नवस्नेहचा अंक मिळाला नसेल त्यांनी संघ कार्यालयात कळवावे. त्यांना अंकाची पीडीएफ व्हॉटस्ॲपवर पाठविली जाईल.**

# चंपाताई पेंढारकर

स्वातंत्र्य मिळावं ही प्रत्येक भारतीयाची तळमळ..तीव्र इच्छा अन् ध्येय जेव्हा बनलं तेव्हा प्रत्येक जण आपल्याला काय करता येईल. आपण काय व कसं करू शकतो. याच एका विचारांनी पछाडलेला होता. त्यात स्त्री पुरूष आपण जे करू ते राष्ट्रासाठी करू या भावनेने भारावलेले होते. या स्वातंत्र्य लढ्यात शेतकरी, कामगार, महिला, विद्यार्थी, कोणी कोणीही दूर राहिले नाही. त्यामधीलच एक तेजस्वी घटक म्हणून चंपाताईंचा उल्लेख करावा लागेल.

सर्व देशभर प्रचंड उठाव झाले. अनेक ठिकाणी ग्रामराज्ये निर्माण झाली. संपूर्ण भारतात १९४२ चा रणसंग्राम सुरू झाला. ऑगस्ट १९४२ ते फेब्रुवारी १९४३ या काही काळ इंग्रज सत्तेचे आसन पूर्णतः डळमळीत झाले.

चले जाव चळवळीच्या पहिल्या टप्प्यामध्ये चंपाताईला अटक करण्यात आली. प्रथम वीस दिवस लॉकअपमध्ये कराडच्या मामलेदार कचेरीत, एक दिवस कोरेगाव, आणि पुढे सहा महिने येरवडा जेलमध्ये केस करता न आल्याने डेटेन्यू म्हणून ठेवण्यात आले. १९४३ च्या जूनमध्ये सुटल्यानंतर शांताताई जेव्हा कराडला परत आल्या तेव्हा सारेच वातावरण मरगळले होते. विद्यार्थी परिषद थंड होती बरेच क्रांतिकारक पकडले गेले होते. दादाही तुरुंगातच होता. काय करायचे हेच चंपाताईला समजेनासे झाले. केवळ वेळ घालविण्यासाठी आपल्या वडीलांना त्यांच्या व्यवसायात मदत करणे, धंद्याचे हिशोब घेणे या कामात तिने लक्ष घातले. पण स्वातंत्र्यासाठी तिचे मन धडपडत होते. चंपाताईला काळजी होती ती स्वातंत्र्याची. तर वडीलांना काळजी होती मुलीच्या लग्नाची. एकवीस वर्षाच्या मुलीशी लग्न कोण करणार? शिवाय ही मुलगी तुरुंगात जाऊन आलेली ! वडील आणि दादा धडपड करीत होते. अचानकपणे दादांनी आपल्या मित्राला बहिणीच्या लग्नासंबंधी विचारले. तो मित्रही स्वतंत्र विचारांचा आणि स्वातंत्र्यप्रेमी होता. पण भविष्यकाळात दोघांच्या स्वतंत्र विचार प्रवृत्तीमुळे पटले नाही तर काय? या विचारांची पाल चुकचुकत होती. या दोन तरूण जीवांनी विचारविनिमय करून रजिस्टर मॅरेज करण्याचा निर्णय घेतला. कवी यशवंतानी त्या शुभप्रसंगी काव्य गायन केले. यशवंतराव चव्हाण यांनी उद्बोधक विचार मांडले. शाहीर नानिवडेकर यांनी राष्ट्रगीत वंदे मातरम् म्हटले आणि १९४४ मध्ये चंपाताई विवाहबध्द झाल्या आणि सौ. शांता कुलकर्णी म्हणून समाजात मान्य झाल्या पण आजही त्याना चंपा कुलकर्णी असेच म्हणतात.

जेव्हा चंपाताईंचा विवाह झाला तेव्हा सासरच्या मंडळीना ही वयाने वाढलेली, तुरुंगात गेलेली, चळवळ्या प्रवृत्तीची मुलगी संसार कसा करणार हाच मोठा प्रश्न पडला. पण लग्न झाल्याबरोबर चंपाताईनी स्वयंपाकघराचा प्रथम ताबा घेतला. आणि पहिल्या जेवणाच्या पंगतीला वडीलधाऱ्या मंडळीकडून तृप्ततेचा आशीर्वाद मिळवला. घरातील सर्व मंडळी चंपाताईवर बेहद्द खुश झाली. पण आपली देशाप्रतीची जबाबदारी, कर्तव्य ताई विसरल्या नाहीत.

१९४६ मध्ये चंपाताईंचे दादा तुरुंगातच वारले, धाकटा भाऊ विष्णू पकडला गेला. या धक्याने वडिलांना अर्धांगवायूचा धक्का बसला. हे सर्व एका बाजूला सहन करीत असता चंपाताई दोन मुलांची माता झाली होती. याच काळात चंपाताईंचे कुटुंब स्थलांतर झाले. पुण्यामध्ये अच्युतराव आपटे, भाऊसाहेब रानडे, सुमित्राबाई केरकर, हरिभाऊ फाटक ही मंडळी एकत्र जमून स्वातंत्र्यानंतर विधायक काम करण्याच्या दृष्टीने विद्यार्थी सहायक समिती या मंडळीनी स्थापन केली. चंपाताई त्यामध्ये सामील

झाल्या. सुशिला अंबिके, अनुताई याही त्यांच्याबरोबर काम करीत होत्या. विद्यार्थी सहायक समितीचे कार्य वेगाने वाढत होते. पानशेत धरण फुटल्यानंतर चंपाताईनी मदतकार्याला वाहून घेतले. पूरग्रस्तांच्यासाठी मदत करीत असता श्रमसरकार महिला संघ ही संस्था निर्माण झाली. पूरग्रस्त स्त्रियांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी छोटे छोटे उद्योग या महिला संघाने सुरू केले. या संघाचे आर्थिक व्यवहार चोख असावेत म्हणून चंपाताईने सहकारी खात्याचा डिप्लोमा केला. डिप्लोमा घेणारी ती पहिली महिला होती. बुध्दिमान असल्यामुळे त्या पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाल्या. महिला संघ विकसित होत होता. हळूहळू त्या संघाने लाकडी खेळण्याचा, गालिच्यांचा प्रकल्प सुरू केला. चंपाताईने या प्रकल्पात स्वतःला झोकून दिले. नंतर छोट्या मोटारींचे वायंडिंगचे काम, नंतर प्रिंटेड सर्कीट बोर्डचे काम सुरू झाले. फिलीप्स कंपनीनेही त्यांना सहकार्य दिले. सहकार खात्याच्या नवनवीन योजना त्यानी राबवण्यास सुरुवात केली. जर्मन समाजवादी कामगारांकडून संस्थेच्या वाढीसाठी मदत मिळत गेली. त्यामधून कॅन्टिन सुरू करण्यात आले. नवीन मशिनरी घेऊन अनेक विभाग सुरू झाले. वनाज कंपनीकडून रेग्युलेटर असेंब्लीचे कामही मिळाले. या सर्व धडपडीतून पैसेही मिळू लागले. पण या पैशाचा स्वतःसाठी उपयोग न करता खेळांच्या स्पर्धा, व्याख्यानमाला लावणे, कामगार भगिनींचे जीवनमान उंचवण्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले.

याच अवधीत इंदिराबाई नातू यांनी आपला खिलौना हा बाहुल्यांचा कारखाना बंद करण्याचा निर्णय घेतला होता. तो कारखाना या महिला समितीला विकत घेता का? म्हणून विचारणाही झाली होती. चंपाताईंनी पुढाकार घेऊन तो कारखाना ताब्यात घेतला. त्यासाठी आवश्यक असलेले आर्थिक भांडवल जमा करून विकसित तंत्रज्ञानाचा अभ्यास करून चंपाताईनी कारखाना समृध्द केला. यामध्ये नावीन्यपूर्ण बाहुल्यांच्या निर्मितीला सुरुवात केली. पस्तीस वर्षे त्या या क्षेत्रात काम करीत आहेत. कोठेही न थकता अधिकाधिक उंच क्षितिजापर्यंत झेप घेण्याचा त्यांचा प्रयत्न चालूच आहे.

स्वतंत्र भारतातील नागरिकांना समर्थपणे स्वाभिमानाने जगता यावे यासाठी त्या आजही प्रयत्नशील आहेत. त्यांची मुलगी लष्करातील जवानांच्या स्त्रियांसाठी वेलफेअर विभागात काम करते. तेथे जवानांच्या मुलांच्या कार्यशाळेत त्याच निष्ठेने ती काम करीत आहे. आपल्या आईचा वारसा ती चालवित आहे. स्वातंत्र्य सैनिकाचे मिळणारे मानधन त्या स्वतःसाठी मुळीच वापरत नाहीत. या मानधनातून त्यांनी जान्हवी ट्रस्ट निर्माण केला. अडीअडचणीत असलेल्या मुलामुलींना त्यांच्या शिक्षणासाठी या ट्रस्टमधून सहाय्य दिले जाते. या ट्रस्टच्या विश्वस्त स्वतः चंपाताई आहेत. जवानांच्या महिलांसाठी काम करणारी त्यांची कन्या वैदेही देशपांडे आणि मैत्रिणी शुभश्री माजगावकर, वर्षा गुप्ते, विजया कुलकर्णी, सुमित्रा शेजवलकर इत्यादी भगिनी काम करीत आहेत. आज चंपाताई वार्धक्याने थकलेल्या असल्या तरी त्यांच्या कामात खंड पडलेला नाही. त्यामुळेच त्यांची इंग्लंडमधील नातवंडे अभिमानाने सांगतात ‘अवर ग्रँडमदर इज रियली ग्रेट !’

त्यांच्या घरातील मंडळीना त्यांचा सार्थ अभिमान आहेच, पण अनेक देशभक्त भगिनींना त्यांनी आपल्या आयुष्याने एक आदर्श धडा दिला. या अशा अनेक भगिनींचे त्या काळचे असे सहज वाटणारे पण उत्तुंग काम अनेक पिढ्यांसाठी दीपस्तंभासारखे आहे हे नक्कीच!!

अशा अनेक माऊलींना मनःपूर्वक वंदन!!

**– वैदेही जोशी**

मोबा. ९५४५६३५४६५

शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक अठ्ठेचाळिसावा)

१७

दुसऱ्या दिवशी सकाळी मुलांना जाग आली, ती त्या आवाजानं. ती मामीआजी कोणाशीतरी बोलत होती. गेले वीस-बावीस दिवस मजल दरमजल करत केलेली वाटचाल, चालून-चालून दमलेले पाय, थकलेलं शरीर, शीणलेला जीव आणि त्याहीपेक्षा शीणलेलं मन, जिथं मुक्काम केलेला असेल, तिथं माधुकरी मागून कसेबसे दोन घास खायचे, गावाबाहेर, मंदिराच्या ओसरीवर, धर्मशाळेच्या पटांगणात आणि अगदीच कुठं जमलं नाही, तर एखाद्या झाडाखाली मुक्काम करायचा आणि पहाटे उठून पुन्हा मार्गस्थ व्हायचं. असा गेले वीस-बावीस दिवस त्यांचा दिनक्रम होता. त्यातही कोणी हटकलं, काही बोललं, तर पुन्हा तिथून मुक्काम हलवायचा. मनात एकच, पैठणला जायचं होतं. मामाआजोबांच्या वाड्यातली गोठ्याशेजारची का होईना खोली मामाआजींनी दिली आणि हा सगळा शीणवटा पोरांच्या अंगावर आला आणि त्यांना सकाळी जागच आली नाही.

जाग आली, तेव्हा वाड्यात काहीतरी गडबड चालली होती. मामी आजी गुरविणीशी बोलत होत्या. निवृत्तीनं पुढे होऊन विचारलं, ''मामीआजी कसली गडबड चालू आहे? आज काही विशेष आहे की काय?'' निवृत्तीच्या बोलण्यावर मामीआजी म्हणाली, ''होय रे बाळा! आज आपल्याकडे श्राद्ध आहे, म्हणून ब्राह्मण जेवायला यायचे आहेत. त्यासाठी माझी स्वयंपाकाची गडबड सुरू आहे. तुम्हीही तुमची आन्हिकं आवरा आणि ब्राह्मण भोजन झालं, की जेवायला या.'' निवृत्तीनं मान डोलावली. तो खोलीत आला. ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ता सगळी उठली होती. त्यानं या तिघांना श्राद्धाबद्दल सांगितलं. ज्ञानेश्वर काही बोलला नाही, तर सोपानाच्या चेहऱ्यावर चिंता उमटली. ती मुक्तीनं टिपली. तिला राहावलं नाही. तिनं विचारलंच, ''सोपानदादा, काय झालं रे? तुझा चेहरा असा सचिंत का झाला?'' सोपान क्षणभर घुटमळला. गप्प राहिला. ते निवृत्तीच्या लक्षात आलं. ''सोपाना बोल! काय तुझ्या मनात आहे ते सांग!'' सोपान क्षणभर गप्प बसला, मग म्हणाला, ''दादा, आज मामा-आजोबांकडे श्राद्ध आहे, असं तुम्ही म्हणालात; पण दादा, आपण... म्हणजे आपण चौघं इथं या वाड्यात मामाआजोबांच्या घरात आहोत. आपल्या इथं असण्यानं काहीतरी विपरीत घडू नये म्हणजे झालं!'' सोपानानं मनातली शंका बोलून दाखवली आणि सगळ्यांनाच त्या गोष्टीचं गांभीर्य लक्षात आलं. काही क्षण कुणीच बोललं नाही; पण मग ज्ञानेशानं उत्तर दिलं, ''सोपाना, तू म्हणतोस ते बरोबर आहे. आपल्या इथं असण्यामुळे काहीतरी विपरीत घडण्याची शक्यता आहे; पण तूच काल म्हणालास ना, की काहीतरी अघटित घडलं, तरच लोक आपलं ऐकून घेतील म्हणून! मग जर आज काही विपरीत घडलंच, तर आज काही अघटितही घडेल!'' ज्ञानेश्वर बोलत होता. निवृत्तीदादाच्या चेहऱ्यावर प्रसन्नता उमटली. सोपानाच्या चेहऱ्यावर थोडी शंका, थोडा आनंद आणि मुक्ताच्या चेहऱ्यावर अभिमान; पण ज्ञानादादाचा चेहरा मात्र शांत होता. तरीही त्यावरचं तेज वाढलं होतं. सोपानाच्या लक्षात आलं, ही वादळापूर्वीची शांतता आहे. तिघांनीही डोळे मिटले आणि योगसाधना सुरू केली.

मामीआजींचा स्वयंपाक झाला. माध्यान्ह उलटून गेली. मामाआजोबा ब्राह्मणांची वाट पाहत होते; पण त्यांचा पत्ता नव्हता. ते पुन्हा सगळ्यांना

बोलावायला बाहेर पडले; पण सगळ्यांनी स्पष्ट नकार दिला. 'बहिष्कार घातलेली नातवंडं तुमच्या वाड्यात मुक्कामाला आहेत. म्हणून आम्ही येणार नाही,' असं त्यांनी सांगितलं. मामाआजोबा संतापानं पाय आपटतच घरी आले. ते ब्राह्मणांना बोल लावत होते, तसाच मामीआजीलाही! खोलीच्या दाराशी बसून सोपान हे पाहत होता. त्यानं आत वळून ज्ञानेशाला सांगितलं, ''ज्ञानादादा, मला वाटतं विपरीत घडलं आहे. श्राद्धासाठी कोणीही आलेलं नाही.'' ज्ञानेश्वर पद्मासन घालून बसला होता. त्यानं एकवार दीर्घ श्वास घेतला आणि उठून बाहेर आला. बाहेर अंगणात मामआजोबा संतापानं पुटपुटत फेऱ्या घालत होते. श्राद्ध विधी तर होणारच नव्हता; पण मामीआजींनी केलेली सगळी भोजनाची सिद्धता वाया जाणार होती. ज्ञानेशानं पुढं होऊन विचारलं, ''मामाआजोबा काय झालं? काही विपरीत घडलं आहे काय?'' त्याच्या या विचारण्यानं मामा-आजोबांच्या संतापाचा स्फोट झाला. ''तुमच्यामुळे! तुम्ही पोरं इथं राहिल्यामुळे हे सगळं घडलंय! श्राद्धाला कोणीही ब्राह्मण यायला तयार नाहीत. आज... आज तुमच्यामुळे माझे पितर उपाशी राहणार. त्यांना अन्नोदक मिळणार नाही. त्याचं पाप माझ्या माथी बसणार! हे सगळं तुमच्यामुळे... तुमच्यामुळे!'' मामाआजोबा संतापानं ओरडले. ''आणि आमच्याचमुळे स्वर्गस्थ पितरांना अन्नोदक मिळालं तर?'' ज्ञानेशानं दृढ आवाजात विचारलं! मामा-आजोबांच्या चेहऱ्यावर संताप तसाच होता. ते काहीच बोलले नाहीत. ज्ञानेशानं डोळे मिटले आणि सोपानाला आज्ञा केली, ''सोपाना, जा आणि मामाआजोबांच्या स्वर्गस्थ पितरांना बोलावून आण! आज फक्त त्यांच्या वडिलांचंच श्राद्ध असलं, तरी आज इथं त्यांचे सगळेच पितर येऊन जेवतील! जा!'' ज्ञानादादाच्या आज्ञेनं सोपान उठला. वाड्याबाहेर गेला.

मामाआजोबांना काय वाटले कुणास ठाऊक. श्राद्ध विधी सिद्धतेच्या ताटातून त्यांनी तीळ उचलले आणि अंगणातूनच त्यांनी ते दाराबाहेर टाकले आणि स्पष्ट उच्चारात आवाहन केलं,

**आगच्छंतु श्राद्धकाले पितृपितामहप्रविता महाः।**
**आगच्छामः। अस्मत् पितृपितामहप्रवितामहस्थाने**
**क्षणं दत्वा भवभ्दिः प्रसादः कर्तव्यः।**

त्याचं आवाहन अजून पूर्ण झाले नव्हतं; पण पुढचे श्लोक उच्चारायचं भान मामाआजोबांना राहिलं नाही! ज्या दारातून सोपान बाहेर गेला होता, त्याच दारातून त्यांचे पितर एकेक करून आत येऊ लागले! भान हरपून मामाआजोबांनी मामीआजीला हाक मारली. त्यांच्या आवाजातला बदल ऐकून मामीआजी गडबडीनं बाहेर आल्या आणि बाहेरचं दृश्य बघून गांगरल्याच. तोच मुक्तानं पुढे होऊन मामीआजींचा हात धरला. म्हणाली, ''मामीआजी, या सगळ्यांना वाढू या ना?'' मामीआजी सावध झाल्या. लगबगीनं त्यांनी पाट मांडले. सर्व पितर आसनस्थ झाले. पर्णावली, द्रोण मांडून सगळ्यांना भोजन वाढलं. सगळी शांतपणे जेवू लागली. अन्नाचा सुवास बाहेर दरवळू लागला. आपण कोणीच गेलेलो नसताना कृष्णाजीपंतांच्या घरात पंगत कुणाची बसलीये, हे पाहायला ब्राह्मण तिथं जमले आणि समोरचं दृश्य पाहून त्यांनी तोंडात बोटं घातली. त्यांनी पाहिलं वाड्याबाहेर सोपान आणि वाड्याच्या अंगणात ज्ञानेश्वर हात जोडून, डोळे मिटून उभे होते आणि वाड्याच्या पडवीत पंगत चालली होती आणि पंक्तीला चक्क कृष्णाजीपंतांचे पितर जेवायला बसले होते. त्यांचा आपापल्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. प्रत्येक जण एकमेकाला विचारत होता आणि स्वतःला चिमटे काढून बघत होता; पण समोर घडत असलेले सूर्यप्रकाशाइतकं सत्य होतं. पितर जेवून उठले. कृष्णाजीपंतांनी त्यांना मनोभावे प्रणिपात केला. पितर पुन्हा स्वर्गस्थ झाले आणि सोपान आत आला.

मामाआजोबांना राहवलं नाही. त्यांनी चौघाही भावंडाना हृदयाशी धरलं. चौघांची क्षमा मागितली. चौघांना जेवू घातलं. आज कितीतरी दिवसांनी असं

गोडधोड, असं स्वादिष्ट अन्न मिळत होतं. तेही इतक्या प्रेमानं! आजी-आजोबांनी आग्रह करून चौघांना जेवायला घातलं. मामीआजीनं तर चौघांना आपल्या हातानं घास भरवून आपली मातृत्वाची भूक शमवून घेतली. जेवणं झाली. मामाआजोबांना भेटायला आणि झाल्या प्रकाराबद्दल बोलायला काही मंडळी आली होती. मामाआजोबा त्यांच्याशी बैठकीवर बोलत बसले. दमलेली मामीआजी वामकुक्षी घेत होती. चौघं जण खोलीत बोलत बसली होती निवृत्ती म्हणाला, ''ज्ञानेशा अघटित ते तू घडवून दाखवलंस. कदाचित आता तरी लोकांचे डोळे उघडतील!'' ज्ञानेश्वर काही बोलला नाही तोच मुक्तानं विचारलं, ''सोपानदादा तू बाहेरच का थांबला होतास. त्या सगळ्यांची जेवणं झाल्यावर ती सगळी मार्गाला लागल्यावर तू आत आलास! बाहेर काय करत होतास?'' मुक्ताच्या या प्रश्नाचं उत्तर देताना सोपान थोडा संकोचला; पण ज्ञानादादा म्हणाला, ''सांग सोपाना, सांग तिला! या मार्गातले अडथळे तिलाही समजले पाहिजेत!'' मग मात्र सोपानानं उत्तर दिलं, ''मुक्ते, ज्ञानादादानं मला आज्ञा केली, त्याप्रमाणे मी मामाआजोबांच्या स्वर्गस्थ पितरांना आवाहन केलं. ज्ञानादादानं आपल्या योगसामर्थ्यानं त्यांना या भूतलावर आणलं; पण त्यांच्याबरोबर काही पाशवी शक्तीही भूतलावर, मामाआजोबांच्या घरी येऊ पाहत होत्या. त्या जर आल्या असत्या, तर श्राद्ध कर्मात बाधा आली असती. मामाआजोबांना पुण्य लाभलं नसतं. त्या शक्तींना रोखून धरण्यासाठी मी वाड्याबाहेर थांबलो होतो!'' मुक्ताच्या डोळ्यांत कौतुक उमटलं, तर निवृत्तीदादाच्या डोळ्यांत अभिमान ! काही क्षण असेच गेले आणि कृष्णाजीपंतांची हाक ऐकू आली. चौघंही बाहेर आले. कृष्णाजीपंत म्हणाले, ''निवृत्ती, ज्ञानेशा, सोपाना, मुक्ता चला माझ्याबरोबर. आपण धर्मसभेत जायचं आहे. इथं घडलेला सारा वृत्तान्त आचार्यांच्या कानांवर गेला आहे. आपण त्यांना भेटून येऊ!'' चौघांनाही अतिशय आनंद झाला. मामीआजी हे सगळे ऐकत होत्या. 'आता ही लेकरं धर्मसभेत निघाली आहेत. तिथं कट्टर धर्ममार्तंड बसले आहेत. कसा निभाव लागणार या लेकरांचा तिथं? कोण ऐकून घेणार याचं? या लहानग्यांची दाद कोण घेईल तिथं?' मामीआजीच्या मनात हजारो प्रश्नांनी थैमान मांडलं ! शंकांनी काहूर उठवलं! पण मामी आजीला कुठं माहीत होतं की, वेळच अशी येणार आहे, की धर्मसभेला या लहानग्यांची दाद घ्यावीच लागेल.

मामा आजोबांबरोबर चौघं जण पैठणच्या धर्मसभेत गेली. गेले कित्येक दिवस या ठिकाणी येण्याची त्यांनी तयारी केली होती. मैलोगणती पायपीट केली होती आणि आता तो क्षण, ती वेळ आली होती. स्वतःला सिद्ध करण्याची! धर्मसभेत त्यांनी प्रवेश केला. धर्मसभेच्या आचार्यपीठावर आचार्य बोपदेवशास्त्री बसले होते. दुसऱ्या आसनावर रामशास्त्री बसले होते. कृष्णाजीपंतांनी आचार्यांना वंदन केलं. चौघांनी त्यांचेच अनुकरण केलं. कृष्णाजीपंतांनी या चौघांना इथं घेऊन येण्याचं प्रयोजन सांगितलं. आचार्यांनी प्रत्येकाला आपापली ओळख सांगण्यास सांगितलं. प्रथम निवृत्ती पुढे झाला. आचार्यांना वंदन करून म्हणाला, ''मी विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांचा ज्येष्ठ पुत्र आणि गहिनीनाथांचा शिष्य निवृत्ती, म्हणजे निवृत्तीनाथ.'' आता ज्ञानेश्वर पुढे आला. त्यानं धर्मपीठाला वंदन केलं आणि स्वतःची ओळख करून दिली. ''मी विठ्ठलपंत आणि रुक्मिणी आईचा दुसरा पुत्र आणि निवृत्तीनाथांचा शिष्य ज्ञानेश्वर.'' यानंतर पुढे आला सोपान. त्यानं धर्मपीठाला वंदन केलं आणि म्हणाला, ''आचार्य, मी विठ्ठलपंत आणि रुक्मिणी आईचा कनिष्ठ पुत्र आणि निवृत्तीनाथांचा शिष्य सोपान, म्हणजे सोपानदेव.'' आता मुक्ताची वेळ होती. ती पुढे झाली. तिनंही धर्मसभेला प्रणाम केला आणि म्हणाली, ''आचार्य, विठ्ठलपंत आणि रुक्मिणी आईची मी कनिष्ठ कन्या मुक्ता.'' चौघांनी आपली ओळख करून दिली. इतका वेळ धर्मसभेत शांतता होती. (क्रमशः)

**– सौ. मंजुश्री गोखले,** मो. ८८०५३५५२००

# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमशः वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

**अध्याय ९ : राजविद्या राजगुह्ययोग**

**।। श्री भगवानुवाच ।।**

**श्रीकृष्ण म्हणती अर्जुना जाण । हे गुह्य असे परम पावन । तूं माझा भक्त म्हणोन । तुज सांगेन ज्ञान विज्ञानासहित ।। हे तुवा जाणतलियावरी । ज्ञान होईल अवधारी । दु:खापासाव निर्धारी सुटसी तूं।।**

आतां गुपित हें थोर सांगतों निर्मळा तुज ।
विज्ञानें कसिलें ज्ञान अशुभांतूनि सोडवी ।।१।।

**राज्यविद्या राजगुह्य जाण । उत्तम आणि पवित्रपण । हे प्रत्यक्ष धर्म जाणाया योग्य म्हणोन । सुख देतसे नाश रहित ।।**

राज-विद्या महा-गुह्य उत्तमोत्तम पावन ।।
प्रत्यक्ष हें सुखें लाभे धर्म-सार सनातन ।।२।।

**अर्जुना ये धर्मी जया श्रद्धा नाहीं । तो मज न पवे कहीं । ये मृत्युसंसारी वर्ते पाही । जीवरुपें ।।**

लोक नास्तिक हा धर्म अश्रद्धेने न सेविती ।
मृत्यूची धरिती वाट संसारी मज सोडुनी ।।३।।

**मी सर्व जगाचे ठायी । व्यापक अव्यक्त मूर्ति पाही । भुते सर्वही माझ्या ठायी । मज कोणाचा नाही आश्रयो ।।**

मीं चि अव्यक्त-रूपानें जग हे व्यापिले असे ।
माझ्यांत राहती भूतें मी न भूतांत राहतो ।।४।।

**माझ्या ठायी असती भूते । ऐश्वर्य माझे निरुतें । भूतातें मी धरितां निश्चितें । आणि भूतावेगळा असे आत्मगुणरुपें ।।**

न वा भूतें हि माझ्यांत माझा हा दिव्य योग की ।
करितों धरितों भूतें परी त्यांत नसें कुठे ।।५।।

**जैसा वायो आकाशाच्या ठायी । सर्व व्यापक असे पाही । तैसी सर्व भूतें माझ्या ठायी । असती देख ।।**

आकाशांत महा-वायु सदा सर्वत्र राहतो ।
माझ्यांत सगळी भूतें राहती जाण तूं तशीं ।।६।।

**सर्व भूतें अर्जुना । माझे प्रकृतितें पावती जाण । कल्पांती साठऊन । कल्पादि सृजी मागुता मी ।।**

कल्पांती निजवी भूते मी माझ्या प्रकृतीमध्ये ।
कल्पारंभी पुन्हा सारी मी चि जागवितों स्वयें।।७।।

**प्रकृतीचे बळें करुनी । सृजी मागुते मागुत्यागी । हे सर्व भूतग्राम आदि करुनी । प्रकृतीचे आधीन असती।।**

हाती प्रकृति घेऊनि जागवी मी पुन्हां पुन्हां ।
भूतांचा संघ हा सारा प्रकृतीच्या अधीन जो ।।८।।

**म्हणोनि कर्मी तयाचियां । मी न बाधे धनंजया । उदास होउनियां । असक्त नोहे ।।**

परी ही सगळी कर्मे बांधूं न शकती मज ।
उदासीनापरी राहे अनासक्त म्हणूनियां ।।९।।


**प्रकृति माझे अधिष्ठान करुन । चराचरातें प्रसवे जाण। या कारणे अर्जुना जन्म मरण । जगासी ।।**

साक्षी मी प्रकृति-द्वारा उभारी सचराचर । ।
त्यामुळें सर्व सृष्टीची ही घडामोड होतसे ।।१०।।


# मुलांचे पान




## » चित्र रंगवा





## » फरक ओळखा






## » ठिपके जोडून चित्र तयार करा







# मनाला खुपणारं कागदावर
# नात्यांचे धागे

## (लेखांक ७)

आपण जन्माला येण्याचा अवकाश की, आपल्याभोवती असंख्य नाती गोळा होतात. कुणाची मुलगी, कुणाची नात, कुणाची बहिण, भाची, पुतणी इ. नात्यांचे असंख्य धागे आपल्या आयुष्याचं वस्त्र विणायला लागतात. कोणतेही कापड विणून तयार करताना उभे-आडवे धागे अगदी छान नीट बसावे लागतात. त्यात अंतर पडून चालत नाही किंवा धागे अडकून न सुटणारी गाठ निर्माण होऊन चालत नाही. तुम्ही स्वेटर विणत असाल तर उलट-सुलट टाके, टाके कमी करणे, वाढवणे या साऱ्यांचं भान ठेवावं लागतं. तसंच हातमागावर किंवा मशिनवर साडी, शाल, चादर इ. विणताना उभ्या-आडव्या विविध रंगांच्या धाग्यांबरोबरच मधलं डिझाईन, काठ इ. साऱ्यांची वीण करताना पूर्ण भान ठेवावं लागतं. आयुष्याचं वस्त्र विणताना सुख-दुःख, राग-लोभ, प्रेम, द्वेष, हेवे-दावे इ. चे उभे आडवे धागे असतात आणि हे धागे म्हणजेच नाती. जे कधीही नाहीसं होत नाही ते नातं.

आयुष्य जगताना प्रत्येकाला या नात्यांची गुंफण करावी लागते. वय, लिंग, जात या सर्व भेदांच्या पलिकडे नाते संबंधांचं स्थान आपल्या आयुष्यात असतं. आपल्या जगण्याचं साध्यही नातंच असतं आणि साधनही नातंच असतं. जगण्याचा आनंद, मौज-मजा नात्यामुळेच मिळते आणि कमालीचं दुःख, वेदना आणि यातनाही नातीच देतात. नातं हे पक्ष्यासारखं, एखाद्या फुलपाखरा-सारखं असतं. फारच घट्ट पकडलं तर एखादा पंख दुखावतो आणि सोडलं तर उडून जातं. म्हणूनच नाती फार हळुवारपणे जपावी लागतात. नात्याशिवाय माणूस जगूच शकत नाही. सर्वसंग परित्याग केलेला संन्याशी सुद्धा वनाशी, झाडाशी, नदीशी, एखाद्या प्राण्याशी आणि त्या निर्गुण निराकार परमेश्वराशी नातं जोडतो. नात्यांचा गुंता होऊ नये, नात्याचे धागे तुटू नयेत म्हणून ती जपावी लागतात. नाती जपताना आपण अनेक वेळेला गोंधळतो. कसं वागावं हेच समजत नाही.

फणस कापून त्यातले गरे काढताना आपण हाताला तेल लावतो. ज्यामुळे फणसाचा चीक हाताला न लागता फणसातले गोड गरे सहज काढता येतात. त्याप्रमाणेच नाती आणि नात्यांचे धागे घट्ट सांभाळताना मनाला अनेक प्रकारची तेलं लावावी लागतात. हाताला गैरसमजाचा, वाईटपणाचा चीक न लागता नात्यांचे धागे घट्ट राहतील हे पहावे लागते. नारळातलं गोड खोबरं आणि पाणी मिळवण्यासाठी आधी कठीण कवच फोडावं लागतं. लहानांपासून थोरांपर्यंत प्रत्येकात कमी अधिक प्रमाणात 'अहं'पणा - मी पणा असतो. हा 'मी' पणा सोडणं अतिशय अवघड असतं. त्यातील गोडवा जपण्यासाठी नात्याचे धागे तुटू न देण्यासाठी 'मी' पणा सोडणं, 'मी' पणा कमी करणं अत्यावश्यक असतं. त्याचबरोबर सकारात्मक दृष्टिकोन असणं जरुरी आहे. तसेच बोलताना योग्य शब्द, योग्य देहबोली नसेल तर मनाचा संयम सुटल्याने तुमच्याकडून बोलल्या जाणाऱ्या चुकीच्या शब्दांनी नाती दुरावतात.

त्याचबरोबर हेही कटु सत्य आहे की नाती जपणं हा वन मॅन शो नाही किंवा एकमार्गी प्रक्रिया नाही. नातीं जपणं किंवा तोडणं यामध्ये एकाहून अधिक व्यक्तींचा सहभाग असतो. तरीही मला असं वाटतं, नाती सांभाळण्यासाठी वडिल माणसांनी महत्त्वाची भूमिका घेतली पाहिजे. काही गोष्टी सोडून द्यायला शिकता आलं तरी नाती आपोआप जपली जातात. दिवसामागून दिवस, वर्षामागून वर्षे जातात पण कुणीतरी कधीतरी बोललेले चुकीचे शब्द आपण

विसरायला तयार नसतो. नाती जपण्यासाठी प्रत्येकानं एक पाऊल मागं येण्याची गरज असते. अंतर्मुख होऊन स्वत:ची चूक ओळखण्याचा प्रयत्न केला पाहिजे; आणि माझी चूक झाली, मी असं बोलायला नको होतं-इतपत बोलायला जमलं पाहिजे. यासाठी मनाचा मोठेपणा निश्चितच पाहिजे.

नाती तुटण्यास किंवा नात्यांत कटुपणा प्रामुख्याने चुकीच्या बोलण्याने येतो याची अनेक उदाहरणं आपल्यापैकी अनेकांना आता आठवत असतील. माझी एक मैत्रीण शुभा-तशी अबोलच. बोलली तरी हळुवार आणि मृदु भाषा. एकुलता एक मुलगा, सून जया, दोन नातवंडं आणि शुभा व तिचा नवरा असा छोटासा परिवार. शुभाचा नवरा हयात होता तोवर स्वयंपाक, बाजारहाट, आलं-गेलं सारं काही शुभाच पहात असे. पति निधनानंतर शुभानं एकदम सगळ्यातून लक्ष काढलं. जया सारं काही व्यवस्थित करत असे. पण अन्न खूप वाया जायचं. भाज्याही एकदम नको इतक्या आणल्याने थोड्या फार खराब होऊन टाकल्या जात. शुभानं जयाला याबाबत हळुवारपणे सांगितलं. जया 'बरं' म्हणून थांबली. पण प्रत्यक्षात कोणताही बदल शुभाला जाणवला नाही. दोन-चार महिने असेच गेले. न राहवून शुभा जयाला म्हणाली, 'हे बघ, तुझ्या अंदाजापेक्षा आमटी-भाजी कमी करत जा. भाज्याही एका वेळेला दोन-तीनच आणाव्यात.' यावर जया एकदम म्हणाली, 'हे बघा, हा माझा संसार आहे. माझा नवऱ्याला बक्कळ पगार आहे. थोडं फार अन्न वाया गेलं तर जाऊ दे. तुम्हाला मी शिळं अन्न खा असं म्हणते का? तुम्हीच खाता.'

यावर शुभा परत कधीही या विषयावर सुनेशी बोलली नाही. पण नात्यांच्या विणीतले दोन-चार धागे नक्कीच उसवले गेले होते.

आमच्या शेजारच्या फ्लॅटमधील सुलूताईंना निरोप आणि त्याबरोबर एक वस्तू देण्यासाठी गेले होते. त्यांनी फारच आग्रह केल्याने मी चहा घेण्यास थांबले. आम्ही बाहेरच्या खोलीत बसलो. त्यांनी हाक मारली, 'वीणा, ए वीणा.' चौदा-पंधरा वर्षांची चुणचुणीत मुलगी 'काय गं आजी' म्हणत बाहेर आली.

सुलूताई - हे बघ, मी चहा केलाय, दूध गरमच आहे. चहा गाळून दूध घालून आमच्यासाठी बाहेर घेऊन ये.

हो आजी म्हणत वीणा आत पळाली. एक-दोन मिनिटात भांडं पडल्याचा आवाज आला. सांडलास न चहा म्हणतच तणतणत सुलूताई आत गेल्या. तुझ्या आईचीच मुलगी तू. एक काम धड करायचं नाही. सदा धडफड आणि सांडलवंड - या शब्दांनी त्यांनी आपल्या सुनेलाही बोलून घेतलं.

सुलूताईचीच नात. ती कशी काय गप्प बसेल. आजी तुझ्याच लेकाची मी मुलगी आणि तुझी नात आहे हे विसरू नकोस.

हे शब्द नात बोलली तर आपल्या आईसाठी आजीनं वापरलेले शब्द नात्यांच्या धाग्यांत अडकून राहिले. चहा सांडू दे, तुला भाजलं नाही ना? हे शब्द सुलूताईंनी उच्चारायला हवे होते. पण नको ते बोलल्या.

असे लहान-मोठे प्रसंग घराघरांत घडतात. पण यामुळे नाती तुटत नाहीत. वय लहान आहे,


सोने-चांदी मौल्यवान खरेदी !

गोखले ब्रदर्स

सराफी दुकान

रविवार, 19 : अक्षय्यतृतिया
गुरुवार 23 : गुरुपुष्यामृत

आपलं दुकान
महाद्वार रोडवर
0231-2546585

अजून खूप अनुभव यायचे आहेत किंवा आता वय झालंय. म्हातारपणी काही वेळेला असं वागलं जातं म्हणून सोडलं जातं. नाती दोन प्रकारची असतात. रक्ताचं किंवा आजच्या वैज्ञानिक भाषेत जेनेटिक किंवा रंगसूत्रीय नातं. आजपासून तू मला मेलास, तुझं माझं नातं संपलं असं म्हटलं तरी हे नातं राहतंच आणि ते कधी प्रकट होईल सांगता येत नाही. याबाबत एक गमतीदार सत्य घटना वाचल्याचं आठवतं. गोरेपान, निळे डोळे, पिंगटसर केस असं एक जोडपं. त्यांना लग्नानंतर मूल होतं ते काळा रंग, खालचा ओठ जाड, काळेभोर कुरळे केस असलेलं. हे मूल माझं नाही, म्हणून नवरा घटस्फोटाची मागणी करतो. कोर्टात प्रकरण उभं राहतं. त्या देशातील न्यायाधीश अनुवांशिक शास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांची मदत घेण्याचे सुचवितात. या मार्गाने अभ्यास करताना पती-पत्नी दोघांच्याही आधीच्या तिसऱ्या चौथ्या पिढीत असे शारीरिक वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म असणाऱ्या व्यक्तीशी विवाह झाल्याचे आढळले. रंगसूत्रावाटे अचानक हे गुणधर्म आई-वडिलांकडून अपत्यात आले.

दुसरं नातं जोडलेलं. गुरुशिष्य, डॉक्टर-रुग्ण आणि मैत्री ही जोडलेली नाती. सहवासानं मैत्रीचं नातं दृढमुल होतं. अनेक वेळेला जेनेटिक नात्यापेक्षा अधिक उत्तम राहतं. कारण इथं कायम स्वरुपाचा सहवास आणि कायम स्वरुपाची देवाण-घेवाण नसते. मैत्रीमध्ये परस्परांत भावनिक जवळीक असते. स्वभावात आवडी-निवडीत साम्य असते. या नात्यात तुमच्या हिताचा विचार करून योग्य सल्ला दिला जातो. सुखदु:खात साथ असते, पण वैयक्तिक आयुष्यात लुडबुड नसते. विशेष म्हणजे जोवर या नात्यात आर्थिक देवाण-घेवाणीतून कटुपणा येत नाही तोवर मैत्री अभेद्य राहते. लग्नामुळे दोन कुटुंबात अनेक नाती जोडली जातात. सासू-सून, सासरा-सून, नणंद-भावजय, दीर-वहिनी, जावा-जावा, मामी-भाचे इ. सर्व नाती विवाहातून जोडली जातात. पती-पत्नीचं नातंही जोडलेलं नातं. रक्ताचं-रंगसूत्राचं नव्हे; पण सर्वात चिरकाल टिकणारं नातंही हेच असतं. हे नातं कुटुंबसंस्थेचा पाया असतं.

पैसा-अडका, मालमत्ता, सोनं-नाणं इ. गोष्टी नात्याचे धागे कधीच जोडत नाहीत. उलट हे धागे इतके ताणले जातात की तुटून जातात. त्यामुळे अति ताणून जे तुटते तेही नातंच. माझ्या वडिलांच्या इतका व्यवहारी विचार करणारा माणूस या जगांत नाही. ज्याच्याकडे पैशाची फार कमतरता आहे त्याला मदत केली पाहिजे असे माझे वडिल नेहमी सांगतात आणि त्याप्रमाणं ते वागतातही. अर्थात तो माणूस प्रामाणिक असेल, कष्ट करण्याची तयारी असेल तर त्याला मदत करावीच. या आपल्या वडिलांच्या वृत्तीचं कौतूक करणाऱ्या मुलाला बाबांनी आपल्या संपत्तीची, मालमत्तेची वाटणी करताना हेच तत्त्व वापरलं तर राग येतो. आपल्या वडिलांनी आपल्यावर अन्याय केला असं वाटून तो वडिल, भाऊ यांच्याशी बोलणं टाकून नात्यामध्ये विलक्षण दुरावा आणतो. दोन मुलापैकी एक अगदी उत्तम शिकला. नशीबानं नोकरीही भल्यामोठ्या पगाराची लागली, पण दुसरा मुलगा तोळामासा प्रकृतिमुळे फारसा उच्च शिक्षित झाला नाही. त्याला नोकरीही बेताची लागली. अशा वेळेला आपल्या संपत्तीची वाटणी करताना ज्याच्याकडे मुबलक आहे त्याला चाळीस टक्के आणि ज्याला गरज आहे त्याला साठ टक्के देणे हा खरा न्याय होऊ शकतो. ज्याला वडिलांनी वाटणी करताना थोडसं झुकतं माप दिलं, यामध्ये त्याचा काहीही दोष नसताना त्याच्यावर राग काढला जातो. सख्खे भाऊ एकमेकांचे वैरी होतात.

पैसा माणसं जोडत नाही. माणसं एकमेकां-पासून तोडतोच. पैशासाठी मुलगा, जन्मदात्या आईबाबांचाही खून करायला मागंपुढं पहात नाही. अशा घटना आसपास घडताना पाहिल्या, ऐकल्या किंवा वाचनात आल्या तरी मनावर ओरखडा उठतो. मन सुन्न होतं. आई आणि तिची लेकरं हे सर्वात जवळचं नातं. सर्वात दृढमूल नातं. पण पैशासाठी पोटच्या मुलांना विकणारी आई आज भेटते. क्षणिक

**पान २० वर पहा...**

# मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा !

**(लेखांक तीन)**

रात्रीचा प्रवास करण्याची ही पहिलीच वेळ होती व भरीत भर म्हणून डोळ्यावर झोप होती व पोटात कावळे नृत्य करत होते व मनात विचारांचे थैमान सुरू होते की एवढ्या रात्री जायचे कुठे? थोड्या दूर अंतरावर रस्त्याच्या विरुद्ध बाजूला दिवे दिसू लागले म्हणजे गाव आले असा विचार करून पाय जोराने घुमू लागले. तेवढ्यात मध्ये काही मुले गप्पा मारत बसली होती त्यांना विचारल्यावर त्यांनी गावात हनुमान मंदिरात व्यवस्था होईल असे सांगितले पण तिकडे न जाता हायवेवरच एक ढाबा असल्याची माहिती मिळाली व मी तिथे पोहचलो रात्रीचे साडे दहा वाजले होते कधी एकदा अंग जमिनीवर टाकून निद्राधीन होतोय असे वाटत होते. ढाबा मालकाकडे चौकशी केली. त्याने झोपण्यासाठी एक चारपाई दिली व मी पण झोपण्यासाठी सज्ज झालो. तेवढ्यात तिथे बसलेल्या एका गिऱ्हाईकाने माझी विचारपूस करून ढाबा मालकाला सांगून मला गरमागरम भोजन दिले. जेवून झोपताना मनात विचार आला मैय्या किनारी कधीच मला उपाशी झोपावे लागले नाही तसेच इथे पण मी उपाशीपोटी झोपू नये म्हणूनच तो सर्प माझ्यासमोर तर आला नसेल ना! मी देवाचे आभार मानले व पटकन निद्रावश झालो. आज यात्रेचा सातवा दिवस आता मी हळू हळू सरावलो होतो त्यामुळे सकाळी लवकर उठावे सूर्य नमस्कार, स्नान व पूजा करून सहा वाजेपर्यंत प्रस्थान असा दिनक्रम सुरू होता. आज धाब्यावर दूध पिऊन मार्गस्थ झालो. आज मैय्या (नर्मदा) किनारी जायचे असल्यामुळे उत्साहात होतो. दुपारी बारा वाजेपर्यंत मैय्या किनारी पोहचलो. मैयामध्ये पुन्हा स्नान केले व पुढे मार्गस्थ झालो. रात्रीचा मुक्काम बलवाडा जिल्हा खरगोन येथे एका धाब्यावर होता. सकाळी उठून आज इंदोरकडे निघालो. आज घाट (विंध्य पर्वत) चढून सकाळी अकरा वाजेपर्यंत मुंबई आग्रा हायवेवरून इंदोर येथे पोहचलो. सायकलचे चेकअप करावे म्हणून इंदोर येथील डीकॅथलॉन येथे गेलो पण तेथील कामगार नसल्यामुळे ते काम झाले नाही. पण तिथेच एक अवलिया श्री. सुबोध गांगुर्डे, मूळ गाव रोहा, जिल्हा रायगड हा भेटला. हा पठ्या वयाच्या अवघ्या सत्ताविसाव्या वर्षी सायकल वरून पूर्ण भारतभर भ्रमण करून एक लाख किलोमीटर सायकलिंग करून देशातील सर्व राज्यामध्ये जाऊन तेथील उंच ठिकाणी चढणे व ह्या प्रवासात एक लाख झाडे लावण्याच्या मोहिमेवर होता. किती वेगवेगळे लोक भेटतात व आपल्याला प्रेरित करून जातात. आज रात्रीचा मुक्काम बरलाई येथे माझे नातेवाईक श्री शिधये ह्यांच्याकडे होता. काल नातेवाईकांकडे राहिल्यामुळे चांगलीच बडदास्त होती. त्यामुळे आज फारच ताजेतवाने होऊन पुढील प्रवास सुरू झाला. आज यात्रेच्या आठव्या दिवशी मुंबई आग्रा हायवेवरून देवास मार्गे सरंगपूर येथे डॉक्टर पाटीदार यांच्या शेतघरी राहिलो. सकाळी लवकर निघून गुना या गावी डॉक्टर पाटीदार यांचे मित्र डॉक्टर ओझा यांच्या घरी मुक्काम केला. आज जवळपास १५० किलोमीटर अंतर पार केले होते त्यामुळे पाय दुखत होते. तरीपण या गावी असलेल्या टेकडी सरकार या हनुमान मंदिरात डॉक्टर ओझा यांच्याबरोबर आलो. आज सकाळी उठून पुढील प्रवासात शिवपुरी येथे वीर तात्या टोपे यांच्या समाधी स्थळी गेलो व नतमस्तक झालो. आज श्री. शिढोरे यांच्या घरी वास्तव्याला गेलो. श्री. शिढोरे हे मध्यप्रदेश मधील मराठी कुटुंब. त्यांनी तेथील मराठी भाषिक मंडळींना बोलवून माझा छोटेखानी सत्कार सोहळा केला. मला थोडेसे अवघडल्यासारखे झाले, पण परमुलखात मराठी लोक भेटल्यामुळे मायदेशी असल्यासारखे वाटले.

**– ओंकार गाडगीळ,** मोबा. ९८२२८७६९२२

# शिवजयंती उत्सव २०२६



कोल्हापूर चित्पावन संघ, ब्राह्मण सभा करवीर (मंगलधाम) व कऱ्हाडे ब्राह्मण संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष व्याख्यानमाला बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला घेण्यात आली. 'छत्रपती शिवाजी महाराज : आधुनिक व्यवस्थापनाचे गुरु' हा व्याख्यानाचा विषय होता. प्रमुख वक्ते आदरणीय श्री. सतीश जोशी (मुंबई) हे होते आणि नीलराजे पंडित-बावडेकर (सचिव-श्री रामचंद्रपंत अमात्य चॅरिटेबल ट्रस्ट, कोल्हापूर) आणि मा. सौ. दीपा ठाणेकर (नगरसेविका, को.म.न.पा.) यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. उपस्थितांचे स्वागत ब्राह्मण सभेचे अध्यक्ष श्री. दीपक आंबर्डेकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय श्री. मिलींद गुणे यांनी करून दिला. या कार्यक्रमासाठी श्री. प्रसाद भिडे, श्री. दत्तात्रय आपटे, श्री. किरण धर्माधिकारी, श्री. श्रीकांत लिमये, श्री. धर्मराज पंडित, श्री. पावनगडकर यांच्यासह सर्व आयोजक संस्थांचे संचालक व श्रोते उपस्थित होते.

# मनाला खुपणारं कागदावर - नात्यांचे धागे

**पान ७ वरून पुढे...**

मोहापायी केलेल्या कृत्यांमुळे तिचं मन व्याकुळ होत असेल, पण अगदी रक्ताच्या नात्यापेक्षाही, आपल्या माणसापेक्षाही पैसा वरचढ ठरतो.

प्रेम, लग्न, जिव्हाळा, मदत, सहवास इ. अनेक धागे नात्यांची गुंफण करत असतात. नातं हे या असंख्य धाग्यांमुळे जसं जवळ आणतं तसं हे धागे ताणणाऱ्या घटकामुळे अति ताणलं जाऊन तुटतं. तर अशी ही नाती, मनाला हळवं करणारी, हवी वाटणारी, फार जवळ आली तर टोचणारी, दूर जाऊ लागली तर हुरहूर लावणारी. विविध नात्यांचे तुकडे जोडून जोडून केलेल्या पांघरुणाखाली आपण आयुष्यभर राहण्याचा प्रयत्न करतो आणि तसं केलंच पाहिजे. मनुष्य हा समाजप्रिय-सोशल ॲनिमल आहे. तो एकटा राहू शकत नाही. आजकाल बदलती कुटुंबव्यवस्था, बदलतं व्यक्तिगत, सामाजिक मन यामुळे अनेकांना एकटं रहावं लागतं. ही बदलती कुटुंबव्यवस्था आणि त्यामुळे दूरदूर सरत जाणारी नाती मनाला खोलवर कुठंतरी खुपत राहतात. हाही खुपणारा विचार आपण करूया !

**- कमल हर्डीकर,**

मोबा. ९६८९३६९९२६, ९४२०४५८४२५

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**युनियन बँक ऑफ इंडिया, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 641002050000001)**
**IFSC Code : UBIN0564109**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**



# ‘भारतरत्न’ पंडित भीमसेन जोशी

पंडित भीमसेन जोशी हे ‘भारतरत्न’ या भारतातील सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरविले गेलेले लोकप्रिय हिंदुस्थानी शास्त्रीय गायक होते. पंडित भीमसेन जोशी यांचा जन्म : फेब्रुवारी ४, १९२२ रोजी गदग, कर्नाटक येथे झाला. भीमसेन जोशींचे वडील शिक्षक होते. भीमसेनचा संगीताकडे असलेला ओढा त्यांना पसंत नव्हता. भीमसेनांनी वैद्यकीय अथवा अभियांत्रिकी शिक्षण घ्यावे असा त्यांचा आग्रह होता. या मतभेदांमुळे अखेर भीमसेनांनी घर सोडण्याचे आणि त्याकाळी शास्त्रीय संगीतासाठी ख्यातनाम असलेल्या ग्वाल्हेर, लखनौ, रामपूर या शहरांपैकी एका ठिकाणी जाण्याचे ठरविले. त्याप्रमाणे त्यांनी इ.स. १९३३ साली वयाच्या अकराव्या वर्षी घर सोडले आणि ते ग्वाल्हेरात दाखल झाले.

त्यानंतर भीमसेन जोशींनी खिशात पैसे आणि पोटात अन्न नसूनदेखील गायनाच्या तळमळीपायी उत्तर भारतात अनेक ठिकाणी भटकंती केली. उस्ताद अब्दुल करीम खाँ, वझेबुवा, केसरबाई केरकर, उस्ताद बिसमिल्ला खाँ यांचे गायन-वादन त्यांनी ऐकले. सुरुवातीला ते इनायत खाँ यांचे शिष्य जनाप्पा कुर्तकोटी यांच्याकडे गायन शिकले. त्यानंतर जालंदर येथे पंडित मंगतराम यांच्याकडे व ग्वाल्हेर येथे राजाभय्या पूंछवाले यांच्याकडेही गाण्याचे शिक्षण घेतले. त्यानंतर ते रामपूर येथे मुश्ताक हुसेन खाँ यांच्याकडे काही काळ शिकले. अशा प्रकारे काही वर्षे ग्वाल्हेर, लखनौ, रामपूर येथे व्यतीत केल्यानंतर त्यांचा शोध घेत असलेल्या वडिलांशी त्यांची भेट झाली आणि भीमसेन पुन्हा घरी परत आले. भीमसेनांचा संगीतासाठीचा तीव्र ओढा पाहून त्यांचे वडील भीमसेनांना जवळच असलेल्या कुंदगोळ गावातील रामभाऊ कुंदगोळकर यांच्याकडे घेऊन गेले आणि रामभाऊंनी भीमसेनांना त्यांचे शिष्यत्व दिले. रामभाऊ ‘सवाई गंधर्व’ म्हणून ख्यातनाम होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली, भीमसेनांनी हिंदुस्थानी शास्त्रीय गायनाचे धडे घेतले. रामभाऊ हे किराणा घराण्याच्या पद्धतीचे गायक होते. त्या काळातील परंपरेनुसार भीमसेनांनी गुरुगृही राहून कष्टपूर्वक गायनाचे धडे घेतले. रामभाऊ त्यांच्याकडून तोडी, पुरिया, मुलतानी वगैरे रागांवर रोज सुमारे आठ तास मेहनत करवून घेत. आणि त्यांच्याकडून भीमसेनांनी इ.स. १९३६ ते इ.स. १९४१ पर्यंतच्या काळात शक्य तेवढे ज्ञान आत्मसात केले. त्यावेळी आणि त्यानंतरही ते रोज सोळा तासांचा रियाज करण्याचा स्वतःचा दंडक पाळीत. त्यानंतर गुरू रामभाऊंच्या आज्ञेनुसार भीमसेनांनी त्यांचा निरोप घेतला आणि ते पुणे येथे आले.

भीमसेन जोशींनी, त्यांचे गुरू सवाई गंधर्व यांच्या स्मरणार्थ १९५२ सालापासून पुणे येथे दरवर्षी होणारा सवाई गंधर्व संगीत महोत्सव सुरू केला भीमसेनांनी त्यांची पहिली संगीत मैफिल इ.स. १९४२ साली वयाच्या केवळ एकोणविसाव्या वर्षी पुण्यातील हिराबागेत घेतली. त्यापुढील वर्षीच त्यांच्या काही कानडी आणि हिंदी भाषेतील उपशास्त्रीय गीतांचे पहिल्यांदा ध्वनिमुद्रण झाले. आणि पुढील काही वर्षांनी त्यांच्या शास्त्रीय गायनाचे. सवाई गंधर्वांच्या षष्ट्यब्दी सोहळ्यानिमित्त त्यांनी गायन केले आणि महाराष्ट्राला त्यांची पहिली नीट ओळख झाली. त्यांची लोकप्रियता आणि त्यामुळे

संगीत मैफिलींसाठी करावी लागणारी त्यांची धावपळ वाढली. त्यांच्या त्या काळी वारंवार होणाऱ्या विमान प्रवासांमुळे, त्यांना पु.ल.देशपांडे यांनी गंमतीने 'हवाई गंधर्व' ही पदवी बहाल केली होती. कित्येक वेळा एकाच दिवसात दोन शहरांतील मैफली घेण्यासाठी ते दोनदा विमानप्रवास करीत.

भीमसेन जोशींना हिंदुस्थानी शास्त्रीय गायन पद्धतीचे ख्याल गायक म्हणत असले तरी त्यांनी १९४० च्या दशकात लखनौमध्ये एक वर्ष राहून तेथील ख्यातनाम गायकांकडून ठुमरी शिकून घेतली होती. ते ठुमरीही अतिशय छान गात. भीमसेन जोशींनी 'संतवाणी' या नांवाने मराठी अभंगगायनाचे अक्षरशः हजारो कार्यक्रम केले. कवि वसंत बापट त्यांच्या अभंगवाणी कार्यक्रमात अनेकदा अतिशय सुरेख निरूपण करीत. भारतात शास्त्रीय गायनाच्या हिंदुस्थानी आणि कर्नाटकी या दोन प्रमुख शाखा मानल्या जातात. भीमसेन जोशींचे वैशिष्ट्य असे की ते दक्षिणी भारतात प्रचलित असलेल्या कर्नाटकी गायनातल्या चीजा हिंदुस्थानी पद्धतीने गाऊन दाखवीत. त्यामुळे त्यांचे गायन कर्नाटकी संगीताची परंपरा असलेल्या दक्षिणी भारतातही, विशेषतः तरुण पिढीमध्ये लोकप्रिय झाले.

'संतवाणी' आणि 'अभंगवाणी' हे संगीतकार राम फाटक आणि श्रीनिवास खळे ह्यांनी अनुक्रमे स्वरबद्ध आणि पंडितजींनी स्वरसाज चढवलेले अल्बम खूप गाजले. त्यातील :अगा वैकुंठीच्या राया, अणुरणीया थोकडा, तुका आकाशाएवढा, अधिक देखणे तरी, आता कोठे धावे मन, आरंभी वंदीन, अयोध्येचा राजा, इंद्रायणी काठी, कान्होबा, तुझी घोंगडी चांगली, काया ही पंढरी, आत्मा हा विठ्ठल, तीर्थ विठ्ठल, क्षेत्र विठ्ठल, नामाचा गजर, गर्जे भीमातीर, पंढरीचा वास, चंद्रभागे स्नान, पंढरी निवास सख्या पांडुरंगा, मन, रामरंगी रंगले, माझे माहेर पंढरी, याचसाठी केला होता अट्टाहास, रूप पाहता लोचनी, सावळे सुंदर, रूप मनोहर, ज्ञानियांचा राजा, गुरू महाराव हे अभंग प्रसिद्ध झाले आहेत.

भीमसेन जोशींना इ.स. १९७२ साली मिळालेला पद्मश्री पुरस्कार, इ.स. १९७६ सालचा संगीत नाटक अकॅडमी पुरस्कार, इ.स.१९८५ सालचा पद्मभूषण पुरस्कार, जयपूर येथील गंधर्व महाविद्यालयाची संगीताचार्य ही पदवी, पुण्याच्या टिळक विद्यापीठाची डी. लिट्. ही पदवी, पुण्यभूषण पुरस्कार, स्वरभास्कर पुरस्कार, तानसेन पुरस्कार इत्यादींचा समावेश आहे. पुणे आणि गुलबर्गा येथील विद्यापीठांनी डॉक्टरेटने सन्मानित केले आहे. त्यांनी सुरू केलेला सवाई गंधर्व संगीत महोत्सव हा भारतातील एक मोठा संगीतोत्सव समजला जातो. पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रात पंडित भीमसेन जोशी यांच्या नावाने अध्यासन स्थापण्यात आले आहे. त्यांनी केलेल्या संगीतसेवेमुळे महाराष्ट्र सरकार दरवर्षी भीमसेन जोशी यांच्या नावाचा 'भारतरत्न पंडित भीमसेन जोशी जीवनगौरव पुरस्कार' देते. तो किशोरी अमोणकर २०१२, पंडित जसराज २०१३, प्रभा अत्रे २०१४, राम नारायण २०१५, परवीन सुलताना २०१६, माणिक भिडे २०१७, केशव गिंडे २०१८, अरविन्द पारिख २०१९, एन राजम २०२०, पंडित शिवकुमार शर्मा २०२१, पंडित उल्हास कशाळकर २०२२, पंडित शशिकांत श्रीधर मुळये २०२३,व आरती अंकलीकर टीकेकर २०२४ यांना देण्यात आले. पुणे महानगरपालिका दरवर्षी भीमसेन जोशींच्या जन्मदिनी म्हणजे ४ फेब्रुवारीला त्यांच्या स्मरणार्थ, स्वरभास्कर पुरस्कार या नावाचा पुरस्कार देते. या पुरस्कारासोबतच तीन दिवसांचा संगीत महोत्सवही असतो. १,११,१११ रुपये रोख, मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.भीमसेन जोशींच्या पत्नीच्या नावाने 'वत्सलाबाई जोशी पुरस्कार' दिला जातो. भीमसेन जोशीं यांना अनेक पुरस्कारांनी आणि सन्मानांनी गौरविण्यात आले. इ.स. २००८ साली त्यांना भारतरत्न पुरस्काराने गौरवण्यात आले. या महान गायकाचे सोमवार दिनांक २४ जानेवारी २०११ रोजी पुणे येथे वयाच्या ८८ व्या वर्षी देहावसान झाले.

**– विकास मेहंदळे,** मोबा. ९४२०१५५११४

# पालक-पनीर भाजी अमेरिकन कोर्टात गाजली

अनेक भारतीयांसाठी पालक पनीर ही भाजी अगदी आवडीची. या भाजीने कोलोरॅडो या अमेरिकेतील राज्यातील कोर्टात एका केस द्वारे प्रवेश केला आणि एका प्रथितयश विद्यापीठास केस तडजोडीने मिटवावी लागली.

कोलोरॅडो राज्यातील सीयू बोल्डर विद्यापीठ एक प्रथितयश विद्यापीठ. १८७६ साली स्थापन झालेले, आत्तापर्यंत पाच नोबेल प्राईज मिळवणारे विद्यार्थी येथून शिकलेले आणि सार्वजनिक संशोधन करणाऱ्या अमेरिकेतील ३८ संस्थांपैकी एक असा या विद्यापीठाचा नावलौकिक!

आदित्य प्रकाश हा ३४ वर्षीय भारतीय २०२३ साली या विद्यापीठात मानववंश शास्त्रात पीएचडी करत होता. या भारतीयाला पालक पनीर भाजी अवडणारच. भारतीय रेस्टॉरंट मधून सप्टेंबर, २०२३ मध्ये त्याने ही भाजी मागवली आणि आपल्या हॉस्टेलच्या कॉरिडॉरमध्ये असलेल्या सामूहिक मायक्रोवेव्ह मध्ये गरम केली. आणि इथूनच एका प्रकरणाची सुरवात झाली.

ही भाजी गरम केल्यावर भाजीचा तीव्र वास आजूबाजूला पसरतो म्हणून हॉस्टेल स्टाफने परत ही भाजी इथे गरम केलेली चालणार नाही असे त्याला फर्मावले. आदित्य प्रकाशला ही बंदी आवडली नाही. बंदीला विरोध करताना त्याने सांगितले की मायक्रोव्हेव सामूहिक वापराचा आहे आणि कोणी काय गरम केल्यावर कसला वास येतो ते प्रत्येकाच्या खाण्याच्या सवयी, सांस्कृतिक जडणघडण यावर अवलंबून असते. त्याने म्हटले की ब्रोकोली असलेला पदार्थ गरम केल्यावर जो काही वास येतो तो तुम्हाला चालतो पण पालक पनिरचा चालत नाही असे का. वाद वाढत गेला. यावरून त्याने विद्यापीठ प्रशासन वंशवादी असल्याचा आरोप केला. विद्यापीठ प्रशासनाने त्याला परत बोलावून भाजी गरम न करण्याची सक्त तंबी दिली आणि त्याच्या वागण्याने कर्मचाऱ्यांना असुरक्षित वाटत असल्याचे सांगितले.

याच विद्यापीठात पीएच.डी. करणारी एक भारतीय विद्यार्थिनी उर्मी भट्टाचार्य हिने आदित्यला भेटून पाठिंबा तर दिलाच, पण ही केस योग्य धडा शिकवण्याची आहे असे सांगितले. ती आदित्यला पाठिंबा देत आहे हे कळताच तिची विद्यापीठातील मदत स्वरूपाची नोकरी तातडीने बंद करण्यात आली. यामुळे सगळेच भारतीय विद्यार्थी चिडले. सर्वांनी एकत्र येऊन आदित्य आणि उर्मीस पाठिंबा म्हणून भारतीय पदार्थ मागवून जेवणे चालू केली. भारतीयच ते, अमेरिकेत असले तरी अन्यायाविरुद्ध उभे राहणारच!

आदित्य आणि उर्मी यांनी २०२५ च्या सुरवातीस आपापला पीएच.डी. अभ्यास, परीक्षा सर्व काही यशस्वीपणे पूर्ण केले. पण विद्यापीठाने २०२३ चे प्रकरण उकरून काढत दोघांनाही पीएच.डी. देणार नाही असे जाहीर केले. त्यामुळे मे, २०२५ मध्ये आदित्यने तिथल्या कोर्टात विद्यापीठविरुद्ध केस दाखल केली. एक साधी पालक पनीर भाजी गरम केल्याचे किरकोळ प्रकरण कोर्टात नागरी हक्क, वंशवाद अश्या गंभीर वळणावर गेले. विद्यापीठ अश्या तऱ्हेने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक करिअर बरबाद करू शकते का असाही प्रश्न विचारला गेला. नागरी हक्क समर्थकांनी आदित्यची बाजू उचलून धरली.

या प्रकरणाला वेगळेच गंभीर वळण लागलेले पाहून आणि केस आपल्या विरुद्ध जाणार हे लक्षात घेऊन विद्यापीठाने तडजोड करण्याचे ठरवले. चर्चा होऊन अखेर विद्यापीठाने दोन लाख डॉलर नुकसानभरपाई द्यावी आणि आदित्य तसेच उर्मिला यांना पीएच.डी. द्यावी असा तडजोडीचा निकाल १४ जानेवारी, २०२६ ला कोर्टाने दिला. संक्रांतीच्या दिवशी तिळगुळ घ्या गोड बोला असे झाले असेच यात म्हणावे लागेल. विद्यापीठाने एक अट मात्र ठेवली की या दोघांनी आमच्याकडे परत कोठल्या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ नये. विद्यापीठाने आपल्या वेबसाईटवर आम्ही सर्व समाज आणि संस्कृतीचा आदर करत असल्याने तडजोड केली असे जाहीर केले आहे.
आदित्य सध्या भारतातच आहे. त्याने विद्यापीठच काय, अमेरिकेतही परत जाणार नाही असे सांगून टाकले आहे.

नुकसानभरपाईची रक्कम आजच्या दराने रुपयात काढली तर होतात एक कोटी सहासष्ठ लाख रुपये. पालक पनीर भाजी आणि भारतीय दोन्हीही विद्यापीठास चांगलेच महागात पडले!

**लेखन – प्रमोद कुलकर्णी, पुणे.**

# मायक्रोवेव्ह उद्योग संपला !!!!

जपान सरकारने हे वर्ष संपण्यापूर्वी देशातील सर्व मायक्रोवेव्ह ओव्हनची विल्हेवाट लावण्याचा निर्णय घेतला आहे.

**या बंदीचे कारण :**

हिरोशिमा विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी संशोधन केले आणि असे आढळले की मायक्रोवेव्ह ओव्हनमधील रेडिओ लहरी गेल्या २० वर्षांमध्ये , सप्टेंबर १९४५ मध्ये हिरोशिमा आणि नागासाकीवर टाकलेल्या यूएस अणुबॉम्बच्या तुलनेत,आरोग्याला जास्त हानी पोहोचवतात.

तज्ज्ञांना असे आढळून आले की मायक्रोवेव्ह ओव्हनमध्ये गरम केलेल्या अन्नामध्ये अत्यंत अस्वास्थ्यकर कंपन आणि रेडिएशन असते.

आता जपानमधील 'मायक्रोवेव्ह ओव्हन'चे सर्व कारखाने बंद केले जात आहेत.

साऊथ कोरियाने २०२१ पर्यंत व चीनने सर्व मायक्रोवेव्ह ओव्हन कारखाने होती. २०२३ पर्यंत बंद करण्याची योजना जाहीर केली.

**काशिरा कॅन्सर सेंटर आयोजित कॅन्सर प्रतिबंधावरील परिषद शिफारस करते की :**

१. परिष्कृत तेल नाही, २. प्राणी उत्पत्तीचे दूध नाही (त्याऐवजी शिफारस केलेले सोया दूध), ३. अन्नाचे तुकडे नाहीत (चिकन ब्रॉथ मसाले जसे मॅगी इ.), ४. सोडा नाही (प्रति लिटर साखर ३२ तुकडे), ५. रिफाइंड साखर नाही, ६. मायक्रोवेव्ह ओव्हन नाहीत, ७. इकोकार्डियोग्राफी वगळता जन्मापूर्वी कोणताही मेमोग्राम नाही, ८. खूप घट्ट अंडरवेअर आणि ब्राचा वापर नाही, १०. वितळलेले अन्न पुन्हा गोठवू नका, ११. फ्रीजमध्ये ठेवलेल्या प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये ठेवलेले थंडगार पाणी पिऊ नका. १२. शेव्हिंग किंवा आंघोळीनंतर वापरल्या जाणाऱ्या डिओड्रंटस् टाळा कारण त्यांच्यामुळे कर्करोग होतो.

**या कॉन्फरन्सने आपल्या आहारात खालील गोष्टी समाविष्ट करण्याचा सल्ला दिला आहे :**

१. भाजीपाला, २. साखरेऐवजी मध माफक प्रमाणात वापरले जाते, ३. वनस्पती प्रथिने (मांस ऐवजी बीन्स), ४. दात घासण्यापूर्वी रिकाम्या पोटी शरीराच्या तपमानावर २ कप पाणी, ५. अन्न उबदार असावे आणि खूप गरम नसावे, ६. कोरफडीचा रस + आले + अजमोदा + सेलेरी + ब्रोमालिन (मिश्रण करून रिकाम्या पोटी प्या), ७. दररोज गाजर रस, ८. जेवणासोबत टोमॅटो, लसूण, कांदा

**टीप: अमेरिकन फिजिशियन असोसिएशनला यामध्ये कर्करोगाची कारणे आढळली:**

१. प्लास्टिकच्या कपमध्ये गरम काहीही पिऊ नका, २. कागद किंवा पुठ्ठ्यात गुंडाळलेले किंवा प्लास्टिकच्या पिशवीत (उदा. तळलेले बटाटे) गरम काहीही खाऊ नका. ३. प्लास्टिक किंवा मायक्रोवेव्ह डिशमध्ये खाऊ नका

**टीप : जेव्हा प्लास्टिक उष्णतेच्या संपर्कात येते तेव्हा ५२ प्रकारचे कर्करोग होऊ शकते अशी रसायने सोडली जातात.**

तुम्ही सर्व प्रकारचे शीतपेय जसे की कोला, पेप्सी, एव्ही, फंटा आणि सर्व केंद्रित रस पिणे देखील टाळले पाहिजे. कारण कर्करोग साखरेवर आहार घेतो. ताजे अननस खा आणि अननसाचे मिश्रण टाळा. संध्याकाळी ७ नंतर जड अन्न खाऊ नका.

सकाळी जास्त आणि संध्याकाळी कमी पाणी प्या. खाल्ल्यानंतर लगेच क्षैतिज स्थिती (आडवे/ झोप) घेऊ नका.

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलींची माहिती - एप्रिल २०२६)

| अ. क्र. | वधूचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सायली<br>--- | देशस्थ ऋ. | ५/५/२०००<br>५.३ | काश्यप, वृषभ<br>कृतिका, चौथे<br>अंत्य | M.Com.<br>Computer<br>Course | खाजगी<br>नोकरी | वा.प्रा.<br>३ लाख | श्रीमती सुनिताताई सं. कुलकर्णी<br>पुणे<br>८९८३१३३१७३ |
| २. | अंकिता<br>--- | देशस्थ ऋ. | २०/१०/९९<br>५.४ | जमदग्नी, मेष<br>भरणी, मध्य | C. A. | नोकरी | वा.प्रा.<br>१९ लाख | मनोज वामनराव कुलकर्णी<br>इंदिरा नगर, नाशिक<br>९८६०१३०३२१ |
| ३. | डॉ. गायत्री<br>--- | कोकणस्थ | ५/१०/९८<br>५.० | शांडिल्य, मीन<br>उत्तराभाद्रपदा<br>पहिले, मध्य | B.H.M.S. | --- | वा.प्रा.<br>--- | श्री. ताम्हणकर<br>मिरज<br>९८२३१४६६८३ |
| ४. | कल्याणी<br>--- | यजुर्वेदी | ६/९/९६<br>५.३ | वाच्छायन,<br>मिथुन<br>मृग, मध्य | B.Com. | --- | मा.प्रा.<br>--- | लक्ष्मण वामनराव जोशी<br>नाशिक<br>९४०५८१३६९६ |
| ५. | नमिता<br>--- | यजुर्वेदी | ९/३/९९<br>५.४ | भारद्वाज, वृश्चिक<br>अनुराधा, दुसरे<br>अंत्य | B.E.<br>Electrical | --- | वा.प्रा.<br>--- | घन:श्याम भास्कर पाठक<br>लोणखेडा, जि.नंदुरबार<br>९६२३३६५४४२ |
| ६. | मृदुला<br>--- | यजुर्वेदी | १८/८/९८<br>५.३ | भारद्वाज, मीन<br>पूर्वाभाद्रपदा,<br>आद्य | M.A.<br>English<br>M.B.A. | ॲमेझॉन पुणे<br>वर्क फ्रॉम होम | वा.प्रा.<br>३.६० लाख | मिलींद हरिभाऊ भागवत<br>नाशिक<br>९४२२७४७००७ |
| ७. | अनुप्रिता<br>विनापत्य<br>घटस्फोटीत | देशस्थ ऋ. | ९/४/९१<br>५.३ | अत्री, मकर<br>श्रवण, दुसरे,<br>अंत्य | M.A.<br>Economics<br>Ph.D.<br>Appear | केटरिंग<br>व्यवसाय | मा.प्रा.<br>६०,०००/- | सुरेंद्र भास्करराव घाटपांडे<br>बाणेर, पुणे.<br>९४२२२७४६६५ |
| ८. | अबोली<br>--- | देशस्थ<br>ऋ. | २३/४/९७<br>५.३ | विश्वामित्र, तूळ<br>स्वाती, ३ रे<br>अंत्य | M.Sc.<br>Biotech | पुणे येथे<br>नोकरी | मा.प्रा.<br>--- | संतोष कमलाकर<br>डोंगरगावकर, पुणे<br>८९७५३३९४४० |
| ९. | सानिका<br>--- | देशस्थ ऋ. | १४/८/९७<br>४.११ | वसिष्ठ, धनु<br>मूळ, दुसरे<br>आद्य | B.Com.<br>Nutrition<br>Yoga<br>Naturapathy | --- | मा.प्रा.<br>--- | प्रसाद सुधाकर गुळवणी<br>पुणे.<br>९४२३५७३०८५ |
| १०. | किरण<br>--- | यजु | १९/२/२००१<br>५.७ | अर्शेशन, धनु<br>उत्तराषाढा, अंत्य | B.Com.<br>C.M.A. | बेंगलोर येथे<br>नोकरी | मा.प्रा.<br>७५ हजार | श्रीमती मीराताई रा. देव<br>देवपूर, धुळे<br>९४२३९३५६९१ |

**सानिका राजू कणंगलेकर (वैष्णव)** **O +ve**
**जन्मतारीख :** ८/१०/२००३ **उंची :** ५.१
**शिक्षण :** B.Com. & M.B.A.
**पत्ता : श्री. राजू गोविंद कणंगलेकर**
कोल्हापूर
मोबा. 8624970583
**अपेक्षा :** सुस्वभावी, शाकाहारी

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| सांख्यायन | कुंभ | पूर्वाभाद्रपदा | दुसरे | आद्य | मनुष्य |

**वैष्णवी ओंकार वाळवेकर (देशस्थ ऋ.)** **A +ve**
**जन्मतारीख :** ३१/३/२००१ **उंची :** ५.२
**शिक्षण :** B.Com. व इतर कोर्स
**पत्ता : श्री. ओंकार यशवंत वाळवेकर**
सोमराज कॉम्प्लेक्स, नाळे कॉलनीजवळ, कोल्हापूर.
मोबा. 7823846126, 8623928827
**अपेक्षा :** उच्चशिक्षित, सधन, घर, शेती

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| अगस्ती | मिथुन | मृग | चौथे | मध्य | देव |

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलांची माहिती - एप्रिल २०२६)

| अ. क्र. | वराचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सौरभ A +ve | देशस्थ ऋ. | ३१/३/९४ १७० सेंमी | श्रीवत्स, वृश्चिक अनुराधा, पहिले मध्य, विप्र | Diploma Management | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ३ लाख | प्रमोद सांगवडेकर बाबाजरग नगर, कोल्हापूर ९७६३४६२३११ |
| २. | प्रणव O +ve | देशस्थ ऋ. | ७/५/९२ ५.१० | जमदग्नीवत्स, कर्क आश्लेषा, प्रथम अंत्य, राक्षस | B.E. Electronics | बेंगलोर येथे नोकरी | वा.प्रा. १८.२० लाख | सुधीर घळसासी मुक्त सैनिक वसाहत, कोल्हापूर. ९५५२६८५३५६ |
| ३. | देवदत्त --- | देशस्थ ऋ. | ३१/५/९२ ५.८ | विश्वामित्र, वृषभ कृतिका, दुसरे अंत्य, राक्षस | M.C.A. | गोवा येथे. वर्क फ्रॉम कोल्हापूर | वा.प्रा. ८ लाख | रघुनंदन पंडित जोशी नाळे कॉलनी, कोल्हापूर ८२७५१५४९१४ |
| ४. | आशिष O +ve | कोकणस्थ | १५/२/९१ ५.७ | अत्री, कुंभ धनिष्ठा, चौथे मध्य, राक्षस | M,Com. G.D.C.&A | टीजेएसबी बँक इचलकरंजी | वा.प्रा. ४.५ लाख | हरि चिंतामण फडके ब्राह्मणपुरी, मिरज ९५७९९४८१७५ |
| ५. | गौरव AB +ve | कोकणस्थ | ११/७/९२ ५.६ | भार्गव्य, वृश्चिक ज्येष्ठा, दुसरे मध्य, देव | C.S. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ११ लाख | उदय वसंत बेहरे राजेंद्र नगर, इंदोर, मध्यप्रदेश इंदोर ८८८९१६८६२६ |
| ६. | सर्वेश --- | देशस्थ ऋ. | ९/६/९६ ५.८ | काश्यप, मीन पुनर्वसु, मध्य, दुसरे, मनुष्य | B.E. | इंग्लंड येथे बँकेत | वा.प्रा. ४५ लाख | श्रीपाद कवठेकर तपोवन, नाळे कॉलनी, कोल्हापूर. ९८९०९५९९४७ |
| ७. | चैतन्य O +ve | देशस्थ ऋ. | १३/१२/९९ ५.८ | वसिष्ठ, मकर धनिष्ठा, दुसरे मध्य, राक्षस | MAC | रायचूर येथे नोकरी | वा.प्रा. ८.५० लाख | रविंद्र अनंत वाळिंबे मु.पो.साकुर्डी, ता. कराड ८८०५३७३७६५ |
| ८. | पवन O +ve | देशस्थ यजुर्वेदी | १६/१२/९५ ५.३ | गौतम, कन्या उत्तरा, चौथे आद्य, मनुष्य | ११वी नंतर MCVC | सांगली येथे नोकरी | वा.प्रा. २.६४ लाख | दिगंबर श्रीराम कुलकर्णी बुधगाव, ता. मिरज ९८९०८६५६५८ |
| ९. | देवदत्त --- | देशस्थ | २६/२/९३ ५.२ | गार्ग्य, मेष अश्विनी, पहिले आद्य, देव | १२वी नंतर वेदपाठशाळा | पौरोहित्य व शेती | वा.प्रा. ५ लाख | गोपाळ जोशी मु.पो.शिरोली,कोल्हापूर ८२७५९२०११८ |
| १०. | मयुर --- | देशस्थ ऋ. | १०/९/९८ ५.६ | भारद्वाज, मेष अश्विनी,चौथे आद्य, देव | B.Tech. Civil Engg. | व्यवसाय | वा.प्रा. १० ते १५ लाख | मिलिंद मधुकर कुलकर्णी साने गुरुजी वसाहत, कोल्हापूर ९९२२९९६१२५ |

**केदार गुरुदास केळकर (कोकणस्थ) O +ve**

**जन्मतारीख :** २/८/१९८९ **उंची :** ५.८ फूट

**शिक्षण :** B.Com.

**नोकरी /व्यवसाय :** गोवा/बागायतदार

**वा.प्रा. :** 5 लाख **अपेक्षा :** कोणतीही पोटशाखा

**पत्ता : श्री. गुरुदास केळकर,** गोवा.

मोबा. 9764122843, 7057154946

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| शांडिल्य | कर्क | आश्लेषा | चौथे | अंत्य | राक्षस |

**चैतन्य गजानन फडके (कोकणस्थ) O +ve**

**जन्मतारीख :** १२/५/१९९५ **उंची :** ५.८

**शिक्षण :** B. E. Civil **नोकरी :** व्यवसाय, बँक व्हॅल्युएटर

**वा. प्रा. :** 5 लाख (सरकारी नोकरी)

**अपेक्षा :** सुशिक्षित, मनमिळावू, अनुरूप

**पत्ता : श्री. गजानन फडके**

माधवनगर रोड, सांगली.

मोबा. 8149253825

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| अत्री | कन्या | हस्त | चौथे | आद्य | देव |

# पुरुषोत्तम मासानिमित्ताने सामूहिक दाम्पत्य सोहळा

कोल्हापूर चित्पावन संघातर्फे पुरुषोत्तम (अधिक) मासा निमित्ताने ३०+३ दांपत्य भोजनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. यानिमित्ताने आप्तजनांना दांपत्य भोजनाचा लाभ देऊन पुरुषोत्तम मासाची पुण्यप्राप्ती आपल्या सहभागाने करावी ही विनंती .

सदर सोहळ्यात सहभागी होण्यासाठी यजमानांना रु. ३०००+३०० (रुपये तीन हजार तीनशे फक्त) इतके शुल्क द्यावे लागेल. यामध्ये तीन दांपत्यांच्या (६ व्यक्तींच्या) भोजनाचा तसेच दक्षिणा, सुवासिनींची ओटी आदि सर्व खर्च समाविष्ट आहे. आपणांस अधिक व्यक्ती निमंत्रित करावयाच्या असतील तर प्रति व्यक्ती रु.४००/- (रुपये चारशे फक्त) प्रमाणे अतिरिक्त खर्च येईल.


आपले विनित, कोल्हापूर चित्पावन संघ.

**स्थळ** खरे मंगल कार्यालय, सन्मित्र हौसिंग सोसायटी, शिवाजी विद्यापीठ रस्ता, कोल्हापूर.

**वेळ** शनिवार दि. २३ मे २०२६ (अधिक ज्येष्ठ शु. अष्टमी), रोजी सायंकाळी ५.०० वाजता विष्णू पूजन, आरती व प्रसाद - सायंकाळी ७.३० नंतर दांपत्य भोजन.

- **नोंदणी व संपर्क :** कोल्हापूर चित्पावन संघ, ७६२०५४६२२५, ०२३१- २५४६२२५.
  श्री केदार जोशी (कार्यवाह) ७५८८८३९५२७ ✲ श्री संतोष साने (सह कार्यवाह) ८४५९०१९०९१
- **नोंदणीसाठी अंतिम तारीख - १५ मे २०२६.**

# भगवान श्री परशुराम जयंती उत्सव - २०२६



**नमस्कार मंडळी,**

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी भगवान श्री परशुराम जयंती उत्सव रविवार, दि. १९ एप्रिल, २०२६ रोजी सायं. ४.३० वा. ब्रह्मवृंदांच्या मंत्रोच्चारात पालखी सोहळा (मार्ग - पेटाळा (गडकरी सभागृह) ते महाद्वार चौक ते तटाकडील तालीम, छ. शिवाजी महाराज पुतळा - निवृत्ती चौक मार्गे पेटाळा (गडकरी सभागृह) यानंतर श्री परशुरामांचा जन्मकाळ, आरती, 'मंदिराच्या देशा' हा भारतातील मंदिरांचे अंतरंग उलगडून दाखवणारा अद्‌भूत दृक्‌श्राव्य कार्यक्रम. सादरकर्ते : श्री. इंद्रनील बंकापुरे व महाप्रसाद वितरण असा संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी २००० हून अधिक बांधव आणि भगिनी उपस्थित राहून प्रसादाचा लाभ घेतील असा अंदाज आहे.

असे मोठे उत्सव हे आर्थिक साहाय्यामुळेच यशस्वी संपन्न होतात अशी आमची धारणा आहे. आमची आपणांस विनंती की, आपल्यासारख्या दातृत्व असणाऱ्या दानशूर व्यक्तींनी आपल्या समाजासाठीच्या या उपक्रमांस सढळ हस्ते यथाशक्ती आर्थिक सहाय्य करून कार्यक्रम आर्थिकदृष्ट्या यशस्वी संपन्न होणेसाठी सहकार्य करावे ही नम्र विनंती.

तसेच या भगवान श्री परशुराम जन्मोत्सव - २०२६ साठी यथाशक्ती आर्थिक सहाय्य करणाऱ्या सर्वांना विनंती कीं, आपण दिलेल्या देणगीची रितसर पावती दिली जाते, तशी पावती घ्यावी. देणगीचा स्वीकार व पावती प्रदान खालील संस्थांच्या मार्फतच केवळ केले जाते याची नोंद घ्यावी. (१) ब्राह्मण सभा करवीर (मंगलधाम), कोल्हापूर. (२) चित्पावन संघ, कोल्हापूर (३) कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर. (कोल्हापूर चित्पावन संघाचा क्यूआर कोड सोबत देत आहोत त्यावर पैसे ट्रान्सफर करून सहकार्य करावे ही विनंती.)

कोल्हापूर चित्पावन संघ QR कोड

टीप : चित्पावन संघ कोल्हापूरच्या QR Code/ Scanner वरून पेमेंट केल्यास मो.क्र. ७६२०५४६२२५ या कार्यालयाच्या व्हॉट्स्‌ॲप नंबरवर तुमचे नाव आणि राहण्याचे ठिकाण अवश्य पाठवा... त्यासोबत त्याचा स्क्रीन शॉट सुद्धा शेअर करावा ही विनंती.

आपले नम्र,
संचालक व सल्लागार, कोल्हापूर चित्पावन संघ.
संपर्क :
मकरंद करंदीकर ९४२११९३००५
प्रसाद भिडे ९८२२२४८५००
केदार जोशी ७५८८८३९५२७
संतोष साने ८४५९०१९०९१
सौ संगीता आपटे ८१४९४८००३४

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2025-2027

# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :**
info@shogini.com

**Visit us at :**
www.shogini.com

प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी
मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल,
गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.